# महाराष्ट्र विधानपरिषद

## चौथे (हिवाळी) अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### कृषी व कृषीपूरक व्यवसायांच्या विकास योजनेबाबत

**(१) १६३९ (१८-०३-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी व कृषीपूरक व्यवसायांच्या विकासासाठी रुपये २१०० कोटी खर्चाची शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र राज्य कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) योजना राबविण्यास दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे स्वरुप काय आहे, त्याव्दारे कोणते उद्दिष्ट साध्य करण्याचे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, उक्त योजनेसाठी आवश्यक असलेला निधी रुपये २१०० कोटी कशाप्रकारे कोणत्या अटी व शर्तीवर उपलब्ध करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१५-१०-२०२०) :** (१) होय.

(२) उत्पादक आणि उद्योजकांना नवीन व संघटीत बाजारपेठेत प्रवेश मिळवून देण्यासाठी आवश्यक ते तांत्रिक सहाय्य, पायाभूत सुविधा आणि जोखिम निवारण क्षमता विकसित करण्यासाठी गुंतवणूक करणे हे या प्रकल्पाचे स्वरुप राहणार आहे. या प्रकल्पांतर्गत शेतकरी उत्पादक गटांची निर्मिती व त्यांच्या सक्रिय सहभागाव्दारे शेतकऱ्यांना बाजारपेठेशी जोडणे, शेतमालाचे काढणी पश्चात व्यवस्थापन व प्राथमिक प्रक्रियेव्दारे मूल्यवृध्दी करणे, ग्राहकांसाठी सुरक्षित खाद्य (Safe food) उत्पादीत करण्यास मदत करणे आणि या सर्व उपक्रमांव्दारे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करुन त्यांच्यासाठी उपजिविकेचे स्त्रोत निर्माण करणे ही उद्दिष्टे साध्य करणे अपेक्षित आहे.

(३) प्रकल्पासाठी आवश्यक असलेला रुपये २१०० कोटी निधी जागतिक बँकेचे कर्ज रक्कम सुमारे रुपये १४७०.०० कोटी (US $ २१० दशलक्ष), उर्वरित रक्कम सुमारे रुपये ५६०.०० कोटी (US $ ८० दशलक्ष) राज्य शासनाचा निधी व ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशन (व्हीएसटीएफ) च्या माध्यमातून खाजगी क्षेत्राचा सहभाग (सीएसआर) सुमारे रुपये ७० कोटी (US $ १० दशलक्ष) असा उपलब्ध करण्यात येणार आहे.

(४) प्रकल्पास राज्य, केंद्र व जागतिक बँकेची मान्यता मिळालेली असून प्रकल्प अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अंगणवाडी सेविकांना भ्रमणध्वनीव्दारं उपस्थिती लावण्याचे बंधन घातल्याबाबत

**(२) १९९५ (१८-०३-२०२०). श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी सेविकांना भ्रमणध्वनीव्दारे उपस्थिती लावण्याचे बंधन घालण्यात आले असून ठाणे जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांना पुरविण्यात आलेले भ्रमणध्वनी हे निकृष्ट दर्जाचे असल्याने अंगणवाडी

सेविकांची उपस्थिती लागत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२९-०९-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अनुसूचित जमातीतील कोळी बांधवांना शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या योजनांचा लाभ देण्याबाबत

**(३) २०२५ (१८-०३-२०२०). श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागातील बिकट परिस्थिती व स्वखर्चाने निवारा बांधण्यास सक्षम नसलेल्या दुर्गम भागातील अनुसूचित जमातीतील आदिवासी लोकांना गृह कर्ज योजना, बीज भांडवल योजना, प्रशिक्षण योजना अशा प्रकारच्या अनेक सुविधांचा लाभ शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत दिला जातो, परंतु अनुसूचित जमातीतील कोळी बांधवांना अशा प्रकारच्या कोणत्याही योजनेचा लाभ मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनुसूचित जमातीतील मागास असलेल्या कोळी समाजास शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत असणाऱ्या सर्व योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१९-१०-२०२०) :** (१) नाही.

(२) अनुसूचित जमातीसाठी असलेल्या शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत असणाऱ्या सर्व योजना केंद्र शासनाने प्रसिध्द केलेल्या अनुसूचित जमातीच्या यादीमधील सर्व जमातींना या योजना लागू आहेत. त्यामध्ये क्र.२८ वर कोळी ढोर, टोकरे व क्र.२९ वर कोळी महादेव, डोंगर कोळी व क्र.३० वर कोळी मल्हार यांचा समावेश आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावंतवाडी-दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) कॉरीडॉरमधील पंचवीस गावांमध्ये अवैधरित्या वृक्ष तोड होत असल्याबाबत

**(४) २२३३ (१८-०३-२०२०). श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आवाज फाऊंडेशन, मुंबई यांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिका क्र. १७९/२०१२ (जुना ४०९५/२०११) वर माहे एप्रिल, २०१२ मध्ये वा त्यादरम्यान दिलेल्या निर्णयानुसार सावंतवाडी-दोडामार्ग कॉरीडॉर मधील २५ गावांमध्ये वृक्ष तोडीला बंदी घातलेली असतानाही सदर गावांमध्ये सर्रासपण वृक्षतोड करणाऱ्या माफियांशी असलेल्या संगनमतामुळे सावंतवाडी वन विभागातील उपवनसंरक्षक व अन्य संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसल्याने विनापरवाना वृक्ष तोडीमुळे मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा जाणीवपुर्वक अवमान झालेला असून या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात यावी अशा आशयाच्या मागणीचे एक निवेदन श्री.जयंत रा. बरेगार, रा.साईलवाडा, सावंतवाडी यांनी दिनांक १४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.वने मंत्री, मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर वनवृत्त, कोल्हापूर, प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर व प्रधान सचिव, वने आदीकडे पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनातील मागण्यांबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, याबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (१३-१०-२०२०) :** (१) श्री.जयंत रा.बरेगार, रा.साईलवाडा, सावंतवाडी यांनी दिनांक १४ मे, २०१८ रोजी अर्ज सादर केला होता हे खरे आहे. परंतू, त्यातील नमूद वस्तुस्थिती खरी नाही.

(२) व (३) जनहित याचिका क्र.१७९/२०१२ (आवाज फाऊंडेशन विरुध्द भारत सरकार व अन्य) मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने जनहित याचिकेमध्ये समाविष्ट असलेल्या २५ गावांना वृक्षतोडीस बंदी घातलेली आहे. मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ५/१२/२०१८ रोजीच्या आदेशान्वये संपूर्ण दोडामार्ग तालुक्यामध्ये वृक्षतोड बंदी घालण्यात आली आहे. त्याबाबत जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी दिनांक १३/१२/२०१८ रोजीचे आदेशान्वये दोडमार्ग तालुक्यातील सर्व गावांमध्ये वृक्षतोड बंदीचे आदेश जारी केलेले आहेत. सदर जारी केलेला आदेश दोडामार्ग तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीना पोहोच करणेत आलेला आहे.

प्रस्तुत न्यायालयीन प्रकरणाची मागील सुनावणी दिनांक १४/११/२०१९ रोजी पार पाडलेली असून, सदर प्रकरण पुढील तारीख प्राप्त होणेवर असून सदरची बाब न्यायप्रविष्ट आहे.

---

## सेवायोजन कार्यालयामार्फत बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होण्याबाबत

**(५) २३७७ (१८-०३-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : दिनांक २० जुलै, २०१८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ३५८७५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या सेवायोजन कार्यालयात माहे डिसेंबर, २०१९ अखेरपर्यंत किती बेरोजगारांची नोंदणी करण्यात आली आहे, तसेच, आतापर्यंत सेवायोजन कार्यालयातून किती बेरोजगारांना नोकऱ्या उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेरोजगारांना रोजगार/नोकऱ्या उपलब्ध होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (१२-०६-२०२०) :** (१) राज्यातील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रात माहे डिसेंबर, २०१९ अखेरपर्यंत ७,८६,६४७ इतक्या बेरोजगारांची नाव नोंदणी झालेली असून क्रमवर्धीत नोंदणीपटावर एकूण ४९,९०,०१७ इतके बेरोजगार आहेत. सन २०१९ अखेर २,००,०९६ इतके उमेदवार नोकरीस लागलेले आहेत.

(२) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रे ही राज्य शासनाची रोजगार व स्वयंरोजगारासाठी मदत व मार्गदर्शन करण्याकरिता असलेली यंत्रणा आहे. रोजगार निर्मिती हा यंत्रणेच्या कार्य कक्षेत येत नाही.

तथापि, बेरोजगारी दूर होण्याच्या दृष्टीने (१) रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांचे संगणकीकरण, (२) बेरोजगार उमेदवारांसाठी ग्रंथालय सदृश अभ्यासिका निर्माण करणे, (३) रोजगार मेळावे आयोजित करणे, (४) बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था स्थापन करणे, (५) आदिवासी उमेदवारांसाठी रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र, (६) रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम (ईपीपी), (७) महाराष्ट्र राज्यात व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र स्थापन करणे, (८) प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान, (९) शिकाऊ उमेदवारी योजना, तर स्वयंरोजगारासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत (अ) वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, (ब) गट कर्ज व्याज परतावा योजना, (क) गट प्रकल्प योजना या योजना राबविण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याच्या आपत्कालीन यंत्रणेमध्ये जवानांना सामील करुन घेण्याबाबत

**(६) २५२९ (१८-०३-२०२०). श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आपत्कालीन स्थितीत नागरिकांच्या मदत आणि बचावासाठी स्थापन करण्यात आलेल्या नागरी संरक्षण दलाकडे गेल्या दोन ते तीन वर्षात प्रत्यक्ष मदतीसाठी एकही संदेश न आल्याने या दलातील ४९ जवानांना राज्याच्या आपत्कालीन यंत्रणेमध्ये सामील करुन घेण्याचा प्रस्ताव नागरी संरक्षण दलाकडून गृह खात्याकडे पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावावर शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (०१-१०-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, संचालक नागरी संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक ०३/०६/२०१९ च्या पत्रान्वये नागरी संरक्षण ही संघटना पुर्णपणे राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (SDMA) मध्ये समाविष्ट करण्याबाबत प्रस्तावित केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात पोकरा प्रकल्पातील कृषी यांत्रिकीकरणाचे अर्ज मंजूरीच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

**(७) २५५९ (१८-०३-२०२०). श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत हवामान अनुकूल कृषी यांत्रिकीकरणाचा माहे डिसेंबर मध्ये समावेश करण्यात आल्याने राज्यात अंमलबजावणी होत असलेल्या या प्रकल्पातील १५ जिल्ह्यांमध्ये लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांकडून अर्ज दाखल केले जात आहेत, परंतु

यांत्रिकीकरणाबाबत मार्गदर्शक सूचना नसल्याने अनेक जिल्ह्यातील प्राप्त झालेले हजारो अर्ज मंजूरीच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१५-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## म्हैसमाळ, सुलीभंजन, खुलताबाद व वेरूळ (जि.औरंगाबाद) येथील पर्यटन विकास आराखड्यास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(८) २८६४ (०२-०६-२०२०). श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ७७३ ला दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्ह्यातील म्हैसमाळ, सुलीभंजन, खुलताबाद व वेरूळ पर्यटन विकास आराखडा तयार करून सन २०१७ ते २०२२ या पाच वर्षात ५ हप्त्यात काम करण्याचे नियोजन करण्यात आले, परंतू सन २०१७ ते २०१९ या दोन वर्षात दोन टप्पे असूनही सद्य:स्थितीत रस्ते, पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविता आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कामासाठी निधी वेळेवर मिळत नसल्याने कामे होत नसून ठेकेदाराने निधी अभावी काही काळ काम बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पर्यटन विकास आराखडा ठरल्याप्रमाणे पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (३०-०९-२०२०) :** (१), (२) व (३) औरंगाबाद जिल्ह्यातील वेरुळ, म्हैसमाळ, सुलीभंजन, खुलताबाद येथील पर्यटन विकासाचा रुपये ४३८.४४ कोटीचा ढोबळ आराखड्यास शासन निर्णय, दिनांक ३१/३/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर आराखड्यानुसार माहिती केंद्र, स्वच्छता गृह, वाहनतळ, पर्यटन निवास इ. साठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्यामार्फत रुपये २.८० कोटी निधी वितरीत केला असून तो सदर कामावर खर्च झाला आहे. आराखड्यानुसार पर्यटन विभागामार्फत रुपये ३.३७ कोटी व इतर विभागाकडून (सार्वजनिक बांधकाम विभाग, वने) रुपये ५.७८ कोटी असा एकूण रुपये ९.१५ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून संबंधित यंत्रणामार्फत कामे चालू आहेत. उर्वरित निधी उपलब्धतेनुसार वितरीत करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घाटी रुग्णालय (जि.औरंगाबाद) परिसरात सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभारण्याबाबत

**(९) २८६५ (१९-०६-२०२०). श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटी रुग्णालय (जि.औरंगाबाद) परिसरात पीएमएसएसवाय योजनेंतर्गत रुपये १५० कोटी खर्च करून सुपर स्पेशालिटी रुग्णालयाची उभारणी होत असून सदर रुग्णालयामध्ये मूत्रपिंड प्रत्यारोपण, मेंदू शस्त्रक्रिया, प्लास्टिक सर्जरी व लहान मुलांची शस्त्रक्रिया व उपचार आदि सेवा उपलब्ध होणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन वर्षापासून सुरु असणारे बांधकाम निधीअभावी प्रलंबित असल्याने रुग्णालय सुरू होण्याअगोदरच रुपये २० कोटींची उपकरणे विनावापर बंद असून वीज व पाण्याची व्यवस्था अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयात १२०० पदे निर्मितीचा प्रश्न कायम असून पदे भरल्याशिवाय रुग्णालय सुरु करण्याबाबत तसेच पाणी व वीज व्यवस्थेसह अपूर्ण बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१४-१०-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सदर इमारतीसाठी वीज जोडणीकरीताची प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) यांच्याकडून विद्युत सबस्टेशनची जोडणी करण्यात आली असून विद्युत पुरवठा चालू करण्यात आला आहे.
(३) पदनिर्मितीबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

सदर संस्थेतील इमारतीकरीता वीज व पाणीपुरवठासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाबाबत संबंधित लेखाशीर्षांतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत

**(१०) २८९१ (२९-०५-२०२०). श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.कपिल पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील २८८ केंद्रिय आश्रमशाळांना अनुदान देण्यासाठी तत्कालिन शासनाने सन २०१९-२०२० पासून शाहू-फुले-आंबेडकर अनु.जाती निवासी/ अनिवासी आश्रमशाळांना २०% अनुदान देण्याचा निर्णय दिनांक ८ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शाळांना अनुदान देण्यासाठी दिनांक ९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास एकाच दिवशी या १६५ आश्रमशाळांची तपासणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तपासणीअंती पात्र ठरलेल्या आश्रमशाळांना सन २०१९-२०२० पासून २०% व सन २०२०-२०२१ पासून ४०% अनुदान मंजूर करुन त्यासाठी आर्थिक तरतुद करुन शिक्षक कर्मचार्यांचे नियमित वेतन सुरु करण्यासाठी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१४-०९-२०२०) :** (१) नाही. १६५ आश्रमशाळांना शासन निर्णय, दिनांक ८ मार्च, २०१९ अन्वये तपासणीच्या अधीन राहून २०% अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(२) होय.
(३) याबाबत नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आष्टी (जि.वर्धा) तालुक्यातील नुकसानग्रस्त बागायतदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(११) २९५८ (२९-०५-२०२०). श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आष्टी (जि.वर्धा) तालुक्यातील ४७० हेक्टर पैकी १४० हेक्टर मधील संत्रा बाग पाण्याअभावी उद्‌वस्त होऊन संत्रा बागायतदार शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडून शासनाला अहवाल पाठविण्यात येवूनही याकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त बागायतदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (१९-१०-२०२०) :** (१) व (२) खरे नाही.

(३) सदर कालावधीत कोणतेही नुकसान झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेचा लाभ न मिळाल्याबाबत

**(१२) २९८१ (२८-०५-२०२०). श्री.प्रविण दरेकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४७८२४ ला दिनांक २१ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील दुर्गम भागात वीज वाहिन्या टाकण्याच्या कामात अनेक अडचणी येत असल्याने काही वेळा जागा उपलब्ध होत नसल्याने डोंगर भागात विद्युत खांब उभारणे, वाहतूक करणे अवघड होते तर अनेक वेळा काम करण्यासाठी ठेकेदार उपलब्ध होत नाहीत तसेच खाजगी जागेत खांब उभारण्यास होणारा विरोध आदी कारणांमुळे शेतीपंपाची वीज जोडणी प्रलंबित राहतात, परिणामी राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना अस्तित्वात असून व या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना अनुदानही देण्यात येत असूनही शेतकऱ्यांना योजनाचा प्रत्यक्ष त्याचा लाभ मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सौर पंप बसवण्यासाठी चार कंपन्यांची नियुक्ती करण्यात आली असून दोन वर्षे कंपनीमार्फत युनिटची देखभाल केली जाते तर दहा वर्षात सौर प्लेट नादुरुस्त झाल्यास कंपनीमार्फत ती बदलून देण्यात येते तसेच ज्या शेतकऱ्यांनी कृषी पंप घेतले नाहीत त्यांनी ऑनलाईन नोंदणी करावी असे आवाहन महावितरणतर्फे केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू महावितरणाच्या आवाहनाला शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला असून माहे फेब्रुवारी, २०२० अखेर रत्नागिरी जिल्ह्यातून ८४६ अर्ज प्राप्त झाले, त्यापैकी ५६८ शेतकऱ्यांनी पैसेही भरले असून केवळ २८८ शेतकऱ्यांना सौर पंप जोडण्यात आले, रत्नागिरी जिल्ह्याला सौर पंपाच्या अर्जासाठी जे उद्दिष्ट दिले होते, ते पूर्ण झालेले असल्याने नवीन नोंदणी बंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळावा यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना या चालू ठेवण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.नितिन राऊत (२१-०९-२०२०) :** (१) शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करणे शक्य होण्याच्या दृष्टीने शासनाव्दारे पारेषण विरहीत मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेची अंमलबजावणी महावितरण कंपनीव्दारे करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत राज्यात पहिल्या टप्प्यात २५००० नग तर दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यात (एकत्रित) एकूण ७५००० नग सौर कृषी पंप आस्थापित करण्याचे उद्दिष्ट आहे. प्रत्येक टप्पा सुरु झाल्याच्या दिनांकापासून १८ महिन्यात राबविण्यात येणार आहे. आजमितीस राज्यात एकूण ३३६३० नग सौर कृषी पंप आस्थापित करण्यात आले आहेत.
(२) व (३) योजनेच्या टप्पा-१ अंतर्गत सौर कृषी पंप आस्थापित करण्याकरीता महसूल विभाग निहाय ४ पुरवठादारांना निवडसूचीबध्द करण्यात आले होते. तसेच टप्पा-२ व टप्पा-३ अंतर्गत सौर कृषी पंप आस्थापित करण्याची क्षमता जास्त असल्याने राज्यात एकूण १३ पुरवठादारांना निवडसूचीबध्द करण्यात आले आहे.

याबाबतच्या निविदेच्या अटी व शर्तीनुसार पुरवठादारातर्फे सौर कृषी पंपांची ५ वर्षाची व सौर पॅनलची १० वर्षासाठीची हमी देण्यात आली आहे. या कालावधीत सौर कृषी पंप नादुरुस्त झाल्यास पुरवठादारातर्फे दुरुस्त करुन/ बदलून देण्यात येणार आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात एकूण ९ पुरवठादारांना निवडसूचीबध्द करण्यात आले असून आजमितीस एकूण ८५० अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ८४१ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. यापैकी ५९२ लाभार्थ्यांनी मागणी पत्राचा भरणा केला असून ५८० लाभार्थ्यांनी पुरवठादारांची निवड केली आहे. आतापर्यंत त्यापैकी ३३१ सौर कृषी पंप आस्थापित करण्यात आले आहेत.

संपूर्ण राज्यात उद्दिष्टांपेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यामुळे सद्य:स्थितीत महावितरण कंपनीव्दारे नवीन अर्ज स्वीकारणे तात्पुरते थांबविण्यात आले आहे.

(४) शेतकऱ्यांना दरवर्षी सौर कृषी पंप देण्याच्या दृष्टीने यापुढेही योजना राबविण्याचे शासनाचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद महापारेषण कंपनीच्या पडेगाव येथील पॉवर हाऊसमध्ये शॉक लागुन महिला तंत्रज्ञ यांचा मृत्यू झाल्याबाबत

**(१३) ३०३२ (०२-०६-२०२०). श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद (संभाजीनगर) महापारेषण कंपनीच्या पडेगाव येथील पॉवर हाऊसमध्ये कार्यरत महिला कनिष्ठ तंत्रज्ञ यांचा शॉक लागुन मृत्यू झाल्याचे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापारेषणच्या नियमाप्रमाणे दुरुस्ती करावयाची असल्यास विद्युत प्रवाह खंडीत करणे गरजेचे असतांनाही अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांनी विद्युत पुरवठा खंडीत न करता दुरुस्तीचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२१-०९-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) या संदर्भात अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, औरंगाबाद, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांनी सदर अपघाताची चौकशी केली. या चौकशी अहवालात "श्रीमती नम्रता कुलसंगे यांनी २२० के.व्ही. उपकेंद्र पडेगाव येथे घटनेच्या दिवशी लोकल अर्थिंग करतेवेळी आवश्यक ती पुरेशी काळजी व खबरदारी न घेतल्याने सदरहू अपघात घडलेला आहे." असे नमूद केलेले आहे. सबब सदर अपघातास संबंधित कोणीही जबाबदार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याबाबत

**(१४) ३०४७ (२९-०५-२०२०). श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक ५५६ ला दिनांक २५ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासन आणि भारतीय प्रशासनिक सेवेप्रमाणे राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याबाबत श्री.बी.सी. खटुआ (सेवानिवृत्त भा.प्र.से. अधिकारी) समितीने तयार केलेला अहवाल माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या निर्णयार्थ सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालावर शासनाकडून आजतागायत कोणता धोरणात्मक निर्णय घेण्यात आला वा येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२१-१०-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याबाबत शासनाने नेमलेल्या खटुआ समितीच्या अहवाल तपासून शासकीय कर्मचाऱ्याचे सेवानिवृत्तीचे वय सध्या ५८ वर्षे आहे तेच कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानक व आगारात महिला वाहकांसाठी आवश्यक सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१५) ३०५७ (०२-०६-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.विनायकराव मेटे : तारांकित प्रश्न क्रमांक ४७८६७ ला दिनांक २४ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला प्रवाश्यांची प्रवासादरम्यान गैरसोय होऊ नये, यासाठी एस.टी.बस स्थानकातील महिला प्रसाधनगृहात सॅनिटरी नॅपकिन मशीन बसवण्याची योजना आखण्यात आली होती त्यानुसार मुंबई सेंट्रल बस स्थानकात सॅनिटरी नॅपकिन मशीन योजनेचे उद्‌घाटन मा.पर्यावरण मंत्री आणि अभिनेता अक्षय कुमार यांच्याहस्ते माहे नोव्हेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एक वर्षाहून अधिक कालावधी होवूनही एकाही स्थानकात सदर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली नसल्याने ही योजना कागदावरच राहिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, एस.टी.च्या सेवेत ४५०० महिला वाहक असून महिला वाहकांसाठी बस स्थानक व आगारात असलेल्या विश्रांतीगृहांची दुरवस्था झाल्याने त्याकडे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने दुर्लक्ष केले असून त्यामध्ये असणाऱ्या प्रसाधनगृहांची अस्वच्छता, विश्रांतीगृहाला रंगरंगोटी नसणे, तुटलेल्या खिडक्या, अस्वच्छता अशी विश्रांतीगृहाची अवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्याच्या एस.टी.च्या सेवेत कार्यरत असलेल्या ४५०० महिला वाहक तसेच असंख्य प्रमाणात असलेल्या महिला प्रवाशांच्या सोयीसाठी ‘सॅनिटरी नॅपकिन मशीन’ ही योजना आवश्यक असताना एस.टी.च्या संबंधित विभागाकडून दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू योजना विनाविलंब राबविण्याच्या दृष्टीने तसेच महिला विश्रांतीगृहांची दुरवस्था दूर करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०८-१०-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाव्दारे महिला प्रवाशांसाठी राज्यातील १५ बसस्थानकांवर सॅनिटरी नॅपकीन मशीन बसविण्यात आल्या असून, उर्वरित ठिकाणी सॅनिटरी नॅपकीन मशीन बसविण्याबाबत महामंडळाव्दारे सर्व विभागांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

प्रत्येक आगारामध्ये महिला वाहकांसाठी स्वतंत्र विश्रांतीगृहाची सोय असून, विभागीय पातळीवर आवश्यकतेनुसार वेळोवेळी दुरुस्ती करण्यात येते. आगाराच्या देखरेखीखाली विश्रांतीगृहाची स्वच्छता केली जाते.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गोरेगाव (मुंबई) येथील पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्पाबाबत

**(१६) ३१४३ (२९-०५-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामनिवास सिंह, श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक ४७००३ ला दिनांक १९ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगाव (मुंबई) येथील पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्पातील विकासकाने विक्रीचा भाग तयार करून तो परस्पर विकल्यामुळे तेथील रहिवाश्यांचे पुनर्वसन प्रलंबित असून रहिवाश्यांमध्ये असंतोष पसरल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ६७२ रहिवाश्यांच्या पुनर्वसन प्रकरणी मा.गृहनिर्माण मंत्र्यांनी माहे जानेवारी, २०२० मध्ये केलेल्या पाहणी दौऱ्या दरम्यान रहिवाश्यांना आश्वासन दिले की, पत्राचाळ येथील रहिवाश्यांचे थकीत भाडे, प्रकल्पातील तांत्रिक अडचणी तसेच पुनर्वसन प्रक्रियेचा अभ्यास करुन सदर प्रकल्प पूर्ण करण्याकरिता उपाययोजना सुचविण्यासाठी नियुक्ती केलेल्या

राज्याचे निवृत्त मुख्य सचिव जॉनी जोसेफ यांच्या एक सदस्यीय समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर उक्त पुनर्विकास प्रकल्प पूर्ण करण्यात येईल अशी भूमिका मांडली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीने दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे सादर केलेला अहवालास मान्यता देण्यात आली असुन शासनाच्या दिनांक १० एप्रिल, २०१९ रोजीच्या पत्रान्वये सदरहू अहवालावर म्हाडाचे अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू समितीच्या प्राप्त अहवालातील शिफारशीनुषंगाने कोणकोणते निर्णय घेण्यात आले तसेच पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्पातील बाधित रहिवाश्यांना त्वरित घरे उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जितेंद्र आव्हाड (१९-१०-२०२०) :** (१) पुनर्वसन हिस्सा व म्हाडा हिस्सा अपूर्ण असून विक्री हिश्श्यातील बऱ्याच भूखंडाचे विकास अधिकार त्रयस्थ विकासकाने विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे. पुनर्वसन हिश्श्यांचे बांधकाम अपूर्णावस्थेत असून मूळ रहिवाश्यांचे पुनर्वसन प्रलंबित आहे.

(२) सदरहू पुनर्विकास प्रकल्पामधील मूळ रहिवाशांचे थकीत भाडे देणे, त्यांची पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्ण करणे, म्हाडाच्या सोडतीमधील ३०६ विजेत्यांना सदनिकांचे वितरण करणे, या व इतर अनुषंगिक मुद्दयांच्या अनुषंगाने सदर प्रकरणातील न्यायप्रविष्ट बाबी/मा.न्यायालयांचे आदेश विचारात घेऊन, उपाययोजना सुचविण्यासाठी श्री.जॉनी जोसेफ, सेवानिवृत्त मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती दिनांक १६/०१/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत केली आहे. सदरहू समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(३) मुंबईतील गोरेगांव (प.) येथील म्हाडाच्या सिध्दार्थ नगर, पत्राचाळ वसाहतीतील गोरेगांव सिध्दार्थ नगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीतच्या संयुक्त पुनर्विकासामधील झालेल्या अनियमिततेबाबतची चौकशी करण्याकरीता श्री.जॉनी जोसेफ, सेवानिवृत्त मुख्य सचिव यांची दिनांक

२८/०३/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये एकसदस्य समिती गठीत करण्यात आली होती. समितीचा अहवाल (भाग-१ व भाग-२) दिनांक २७/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केलेला आहे. सदर अहवालात केलेल्या शिफारसींची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने दिनांक १०/०४/२०१९ रोजीच्या शासन पत्रान्वये म्हाडाचे अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत.

(४) व (५) सदर प्रकरणी त्रिपक्षीय करारनामा रद्द करण्याबाबत व संपूर्ण प्रकल्प विक्री हिश्यासह ताब्यात घेऊन विकासकाच्या "रिस्क ॲण्ड कॉस्ट" वर पूर्ण करण्यासाठी म्हाडातर्फे विकासकास दिनांक १२/०१/२०१८ रोजी टर्मिनेशन नोटीस जारी करण्यात आली. तसेच, विकासकाने विक्री हिश्यातील बऱ्याच भूखंडाचे विकास हक्क त्रयस्थ विकासकांना बेकायदेशीररित्या विकल्या प्रकरणी म्हाडाने दिनांक १३/०१/२०१८ रोजी एफ.आय.आर.क्र.८५/२०१८ अन्वये विकासक मे.गुरुआशिष कन्स्ट्रक्शन कंपनी प्रा.लि. व त्यांचे संचालक व इतर यांचेविरुध्द आर्थिक गुन्हे शाखेकडे (EOW) गुन्हा दाखल केला आहे. तथापि, युनियन बँक व इतर बँकाच्या थकित कर्ज प्रकरणी रिसोल्युशन प्रोफेशनल राजेन्द्र के. भुता यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेले अपिल मा.सर्वोच्च न्यायालयाने मान्य केले असून दिनांक १९/०२/२०२० रोजीच्या निर्णयाव्दारे मा.नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल यांना रिसोल्युशन प्रोफेशनल यांचा अर्ज (I.A. No. २१४३३/२०१८) निकाली काढण्याबाबत आदेशित केले आहे. सदर प्रकरण मा.कंपनी लॉ ट्रिब्युनल, मुंबई येथे प्रलंबित आहे. तसेच खाजगी त्रयस्थ विकासकांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यांवर अद्याप सुनावणी चालू असून मा.उच्च न्यायालयाने अंतिम निर्णय दिलेला नाही. सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. तथापि प्रश्न भाग-२ ला दिलेल्या उत्तरानुसार नेमलेल्या समितीचा अहवाल शासनास अद्याप अप्राप्त आहे.

---

## शाहूवाडी (जि.कोल्हापूर) येथील वन विभागाचे RFO यांच्यावर कारवाई करण्याबाबत

**(१७) ३१५३ (०२-०६-२०२०). श्री.सदाशिव खोत** : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील पेंडाखळे शिवण क्षेत्रात घातलेली केबल काढली नसताना वनाधिकाऱ्यांनी केबल काढण्याचे नावावर शासकीय निधी हडप केल्याचे प्रकरण निदर्शनास आले असताना शिरगाव, सावते, निरले, आकुर्डे उचत, लंडोबाचा मळा येथे अंदाजे ३० हेक्टर जमिनीवरील सागवान जांभळा अशा प्रकारची झाडे लावली आहेत असा बनाव केला जात असून प्रत्यक्षात मात्र त्याठिकाणी तीन टक्के झाडे असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाहूवाडी तालुक्यात अनेक ठिकाणी झाडांच्या रोपा ऐवजी खड्ड्यांत मुळे लावली जात असून काही दिवसांनी ते ही वाहून जात असून कोणी तपासणी केली तर त्यावेळी या वाळलेल्या मुळ्या दाखवून रोपे लावली जातात पण रोपे जगलीच नाही असा बनाव वन विभागाकडून केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा प्रकार निदर्शनास आणणाऱ्या तसेच त्याचे चित्रीकरण करणाऱ्या सुरेश खोत यांनी तक्रारी अर्ज दाखल केला म्हणून संबंधित RFO यांच्याकडून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित शाहूवाडी तालुक्यातील RFO यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (२९-०९-२०२०) :** (१) सदर प्रश्नात दोन भाग असून, प्रश्नाच्या प्रथम भागात केलेले केबल विषयक वर्णन खरे आहे व प्रश्नाच्या व्दितीय भागात केलेले रोपवनाविषयक वर्णन खरे नाही.

(i) केबलबाबत :- होय, हे खरे आहे.

पेंडाखळे वनक्षेत्रात रस्त्यालगत वन विभागाच्या परवानगी शिवाय मौजे-पेंडाखळे येथे कक्ष क्र.८५८ मधील ७२५ मीटर एवढ्या अंतरात आणि मौजे येळवडी येथे कक्ष क्र.९४७ मधील २३५५ मीटर अंतरात रिलायन्स जिओ इन्फोकॉम लि. या कंपनीने ऑप्टीकल फायबर केबल टाकल्याचे आढळून आले आहे. सदर केबल जानेवारी, २०१८ ते फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत टाकण्यात आली असल्याचे प्राथमिक तपासणीत निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणी भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम २६(१)ड, २६(१)ह, ३३(१)क, तसेच वन (संवर्धन) अधिनियम, १९८० चे कलम-२ अंतर्गत दिनांक ०७/०१/२०२० रोजी गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

वनक्षेत्रात अनधिकृतपणे केबल टाकताना संबंधित वन कर्मचाऱ्यांनी दुर्लक्ष करुन शासकीय नियम, आदेश व निकषांचे उल्लंघन करुन शासकीय कामात अनियमितता व हलगर्जीपणा केल्याने संबंधित तत्कालीन वनपाल, पेंडाखळे यांचेविरुध्द उपवनसंरक्षक, कोल्हापूर यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम-८ अंतर्गत दिनांक १५/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये दोषारोप लागू केले आहेत. सदर प्रकरणी गुन्ह्यात वापरण्यात आलेली केबल खंडीत करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली रुपये ९०,०००/- इतकी रक्कम केबल खंडीत न करता खर्ची दाखविल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदर रक्कम तत्कालीन वनपाल, पेंडाखळे (अतिरिक्त कार्यभार) यांचेकडून वसूल करण्यात आली आहे व त्यांचेविरुध्द दिनांक १५/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

तसेच, शासकीय नियम, आदेश यांचे उल्लंघन, शासकीय निधीचा अपहार करुन शासनाचे आर्थिक नुकसान केल्याबाबत तत्कालीन वनरक्षक, पेंडाखळे यांचेविरुध्द उपवनसंरक्षक, कोल्हापूर यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम-८ अंतर्गत दिनांक १५/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये दोषारोप लागू केले आहेत व त्यांचेविरुध्द दिनांक १५/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

तसेच, शासकीय नियम, आदेश यांचे उल्लंघन, शासकीय कामात अनियमितता, शासकीय निधीचा अपहार करुन शासनाचे आर्थिक नुकसान केल्याबाबत तत्कालीन वनक्षेत्रपाल, पेंडाखळे (अतिरिक्त कार्यभार) यांचेविरुध्द उपवनसंरक्षक, कोल्हापूर यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम-८ अंतर्गत दिनांक १०/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये दोषारोप लागू केले आहेत व त्यांचेविरुध्द दिनांक १५/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(ii) रोपवनाबाबत :- हे खरे नाही.

मलकापूर वनपरिक्षेत्रातील मौजे शिरगाव, सेवते, नेर्ले, आकुर्ले, उचत (लाडोबाचा माळ) याठिकाणी वन विभागाकडून एकूण ५० हेक्टर वनक्षेत्रावर वृक्ष लागवड करण्यात आली असून त्याची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | रोपवनाचे नाव | क्षेत्र | रोपवन वर्ष | जिवंत रोपांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | उचत | १५ | प्रथम (२०१९ पावसाळा) | ६०.००% |
| २ | नेर्ले | १० | प्रथम (२०१९ पावसाळा) | ७३.००% |
| ३ | आकुर्ले | ५ | प्रथम (२०१९ पावसाळा) | ५१.९७% |
| ४ | शिरगाव | १० | प्रथम (२०१९ पावसाळा) | ३५.८६% |
| ५ | सवते | १० | व्दितीय (२०१८ पावसाळा) | २९.८१% |

मौजे आकूर्ले व शिरगाव येथे भेकर, गवा, साळींद्र, रानडुक्कर या वन्यप्राण्यांच्या वावरामुळे रोनवनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने जिवंत रोपांची टक्केवारी कमी दिसून येत आहे.

मौजे सवते येथे व्दितीय वर्षाचे साग रोपवन असून तेथील ४ हेक्टर रोपवन क्षेत्रावर आग लागल्याने तसेच, सदर ठिकाणी गव्यांच्या, रानडुकरांच्या वावरामुळे रोपवनांचे जास्त प्रमाणात नुकसान झाले आहे व त्यामुळे जिवंत रोपांच्या टक्केवारीचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येत आहे.

(२) हे खरे नाही, शाहूवाडी तालुक्यातील मलकापूर वनपरिक्षेत्रातील मौजे शिरगाव, सवते, नेर्ले, आकुर्ले, उचत या ठिकाणी वन विभागाकडून एकूण ५० हेक्टर वनक्षेत्रावर वृक्ष लागवड करण्यात आली आहे. सदर ठिकाणी कांचन, करंज, खैर, शिसू, जांभळ, आवळा, बांबू इ. प्रजातीच्या वृक्षांची लागवड करताना रोपवाटीकेमध्ये पॉलीथीन पिशवीत तयार केलेल्या रोपांचाच वापर करण्यात आलेला आहे.

(३) व (४) हे खरे नाही, RFO नंदकुमार नलवडे यांच्याकडून जीवे मारण्याची धमकी दिलेबाबतचे पत्र श्री.सुरेख खोत यांनी दिनांक २२/०१/२०२० रोजी मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर यांना देऊन त्याची प्रत उपवनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर कार्यालयास दिली होती. सदर बाबत फौजदारी स्वरुपाची असल्याने उपवनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर यांनी दिनांक १७/०२/२०२० रोजी श्री.सुरेश

जगन्नाथ खोत यांनी दिलेले पत्र पोलीस ठाणे, शाहुवाडी पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर यांना पुढील चौकशीसाठी पाठविले आहे. तथापि, सुरेश जगन्नाथ खोत यांनी कोणत्याही स्वरुपाची तक्रार केली नसल्याचे पोलीस ठाणे, शाहुवाडी पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर यांचेकडून उपवनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर यांना कळविण्यात आले आहे.
(५) विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उस्मानाबाद येथील सामाजिक वनीकरणाच्या कामासाठी आलेल्या निधीचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१८) ३१८५ (०२-०६-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.निलय नाईक, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद येथील सामाजिक वनीकरणाच्या कामासाठी आलेल्या रुपये ११ लाख ५० हजार इतक्या शासकीय निधीचा काम न करताच बनावट कागदपत्रांच्या आधारे गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी विभागीय वन अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय चौकशी समिती नियुक्त करून तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू चौकशी समितीने याप्रकरणी चौकशी करून अहवाल सादर केलेला नाही, तसेच चौकशीस विलंब करीत जिल्हा प्रशासनाचा आदेशाचेही संबंधित अधिकारी उल्लंघन करीत असल्याचे स्पष्ट होत असल्याने तेथील जनतेतही संशयाचे वातावरण निर्माण होऊन तीव्र नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापूर्वीही माहे जुलै, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान रोपवाटिकेच्या कामासाठी वितरीत करण्यात आलेल्या निधीचा गैरव्यवहार करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित दोषी विरोधात तसेच चौकशी अहवाल सादर करण्यास विलंब केल्याप्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (०८-०९-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांनी सहायक वन सरंक्षक, उस्मानाबाद यांना चौकशीचे आदेश दिले होते. त्यानुसार सहायक वन संरक्षक, उस्मानाबाद यांनी चौकशी करुन चौकशी अहवाल दिनांक ०३/०७/२०२० रोजी सादर केलेला असून सदर चौकशी अहवालानुसार चौकशीत काहीही तथ्य आढळून आलेले नाही.

---

## अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयामधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१९) ३२२३ (२९-०५-२०२०). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयामधील पदे रिक्त असून प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक, अधिपरिचारीका, प्रयोगशाळा सहायक, प्रयोगशाळा परिचर, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, निम्नश्रेणी लघुलेखक व इतर पदे मंजूर असूनही शंभरच्यावर पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोला शहरामध्ये पुर्णत्वास आलेले सुपर स्पेशालिटी रुग्णालयामधील बहुतांश पदे शासनाने मंजूर केली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना विषाणूच्या महामारीमध्ये रिक्त पदांमुळे रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नसून कोरोनाग्रस्त रुग्णांसाठी स्वतंत्र ५० खाटांचे रुग्णालय तयार करण्याचे शासनाचे मनोदय आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयामधील पदे भरण्याबाबत तसेच कोरोनाग्रस्त रुग्णांसाठी स्वतंत्र ५० खाटांचे रुग्णालय तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१४-१०-२०२०) :** (१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला करिता वर्ग-१ ते वर्ग-३ संवर्गात एकूण २१५ पदांपैकी ४० पदे रिक्त आहेत. तसेच रुग्णालयाकरिता वर्ग-१ ते वर्ग-३ संवर्गात एकूण ४६७ मंजूर पदांपैकी ८० पदे रिक्त आहेत.
(२) पंतप्रधान स्वास्थ सुरक्षा योजनेंतर्गत अकोला येथे अतिविशेषोपचार रुग्णालयासाठी वर्ग-१ ते वर्ग-४ संवर्गात एकूण ४६५ पदे निर्माण करण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(३) अतिविशेषोपचार रुग्णालयासाठी बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये कोविड रुग्णांकरिता ३०० खाटांची व्यवस्था करण्यात आली असून उपलब्ध मनुष्यबळाच्या माध्यमातून रुग्णांवर उपचार करण्यात येत आहेत.
(४) व (५) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच रुग्णालयातील विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## कोकणातील नुकसानग्रस्त मच्छिमारांना मदत देण्याबाबत

**(२०) ३५०१ (३०-०५-२०२०). श्री.रमेशदादा पाटील, श्री.जयंत पाटील, श्री.विलास पोतनीस, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: कोकणातील मत्स्य व्यावसायिकांवर माहे जून, २०१९ ते मे, २०२० या संपूर्ण वर्षभराच्या कालावधीत प्रथमतः तीन महिन्याची पावसाळी मासेमारी बंदीनंतर कयार वादळातही सलग तीन वादळी नैसर्गिक आपत्ती, एलईडी आणि पर्ससीन नेटमार्फत होणारी मासेमारी, डिझेल परतावा न मिळणे, ओएनजीसी या तेल कंपनीचे समुद्रात होणारे सर्वेक्षण आणि त्यातच भर म्हणून कोरोना-१९ चा प्रादुर्भाव या सर्व नैसर्गिक आपत्तीमुळे केंद्र व राज्य शासनातील लोकप्रतिनिधींनी संकटात सापडलेल्या मच्छिमार कोळी बांधवांसाठी शासनाने मच्छिमार दुष्काळ जाहीर करुन त्यांना आर्थिक मदत करण्याबाबतची मागणी केली असल्याची बाब माहे मे, २०२० च्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मच्छिमारांवर आलेल्या नैसर्गिक आपत्तीचा आढावा घेण्यासाठी सन २०१९ मध्ये राज्य शासनाने एक समिती गठीत केली होती, सदर समितीचा अहवाल सादर करण्यात आला आहे काय, अहवाल केव्हा सादर करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, केंद्रीय मत्स्यव्यवसाय विभागाने पूरग्रस्त मच्छिमारांची आधारकार्ड व बँक खात्यासहित यादी राज्य शासनाकडे मागितली होती, सदर यादी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवली आहे काय, तसेच देशांतर्गत मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवांसाठी केंद्र शासनाने किसान क्रेडीट कार्ड योजना लागू केली असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त मच्छिमारांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (१५-१०-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) कोविड १९ प्रादुर्भावामुळे आर्थिक नुकसान झालेल्या मच्छिमारांना आर्थिक मदतीसाठी केंद्र शासनामार्फत आधारकार्ड व बँक खाते तपशिल सादर करण्याच्या निदेशास अनुसरुन माहिती तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

राज्यातील मच्छिमारांना किसान क्रेडीट कार्ड वाटप करण्याची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु आहे.
(४) दिनांक २६/०८/२०२० रोजीच्या मा.मंत्रिमंडळ बैठकीमध्ये नुकसानग्रस्त मच्छिमारांना मदत देण्याबाबत निर्णय घेण्यात आला असून रुपये ६५.१७ कोटी इतके विशेष सानुग्रह अनुदान अदा करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कोविड-१९ मुळे निर्माण झालेल्या आर्थिक संकटामुळे पद भरती न करण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(२१) ३५१४ (२९-०५-२०२०). श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.किशोर दराडे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोविड-१९ मुळे निर्माण झालेल्या आर्थिक संकटामुळे पदभरती न करण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत उत्तीर्ण झालेले उमेदवार हे कोरोना या रोगाच्या संकटात लोकहितासाठी विनावेतन काम करावयास तयार असून पद भरतीवर बंदी घालू नका अशी मागणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने स्थगित केलेल्या परीक्षा व पूर्वी रिक्त पदाच्या भरतीसाठी शासनाने प्रसिध्द केलेल्या जाहिराती संदर्भात काहीच सुस्पष्टता नसल्याने राज्यात बेरोजगारीचे प्रमाण वाढले जाणार असल्यामुळे यावर योग्य तो तोडगा काढून महाराष्ट्र लोकसेवा आयोग पद भरती वरील बंदी उठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (१५-१०-२०२०) :** (१) कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षात होणाऱ्या अर्थव्यवस्थेवरील परिणामांबाबत वित्तीय उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने वित्त विभागाच्या दिनांक ०४ मे, २०२० च्या शासन निर्णयान्वये सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधद्रव्ये विभाग वगळता कोणत्याही विभागाने कोणत्याही प्रकारची नवीन पद भरती करु नये अशा सूचना देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे.

(२) याबाबत सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाकडे अशी मागणी प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) राज्य शासनाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या परिक्षांवर बंदी घातलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासकीय महाविद्यालय, अकोला येथे एमआरआय मशीन उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२२) ३५३२ (२९-०५-२०२०). डॉ.रणजित पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १२६७ ला दिनांक ३ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय महाविद्यालय, अकोला येथील एमआरआय मशीनसाठी धर्मदाय आयुक्त यांनी निधी देऊन सुध्दा एमआरआय मशीन खरेदी करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला संस्थेसाठी ३ टेस्ला एमआरआय खरेदीसाठी शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान करून रुपये ११.५२ कोटी इतका निधी उपलब्ध करून दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर यंत्रसामुग्रीच्या किंमतीत वाढ झाल्याचे निदर्शनास आल्याने अतिरिक्त निधीबाबत स्थानिक रुग्णालय, प्रशासनाने, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रुग्णालयात एमआरआय मशीन खरेदीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१४-१०-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) सदर मशीन खरेदीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील दूधाची विक्री होत नसल्याबाबत

**(२३) ३५८२ (०२-०६-२०२०). श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.सुरेश धस :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मुंबई, ठाणे व पुणे या कोरोनाच्या हॉटस्पॉट ठरलेल्या अतिगंभीर क्षेत्रात दररोज ३५ लाख लीटर दूध विक्रीविना राहत असल्याने दूध उद्योगाचे नुकसान होत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील कोरोनाच्या आपत्कालीन परिस्थितीत दिनांक १९ एप्रिल, २०२० रोजीच्या शासन निर्णयात शेतकऱ्यांसाठी दुधाला रुपये २५ इतका दर निश्चित केला आहे, तथापि, एसएनएफ (SNF) साठी रुपये एक प्रति कपात करुन रुपये २२ इतका दर शासन निर्णयामध्ये दिला असल्याने शेतकऱ्यांना रुपये २५ दर देता येत नाही, या शासन निर्णयातील त्रुटींमुळे दिनांक २७ एप्रिल, २०२० रोजी नवीन शासन निर्णय निर्गमित करुन एसएनएफ (SNF) च्या त्रुटीमधील दुरुस्ती करून दर कमी केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील शासन निर्णयाप्रमाणे प्रतिदिन फक्त दहा लाख लीटर दूध शासन घेणार असल्याने राज्यातील उर्वरित दूध आणि दूग्धजन्य पदार्थ विक्री विना पडून राहिल्याने दूध उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील दूध उत्पादक शेकऱ्यांच्या दूध वितरण विषयक अडचणी दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (२३-१०-२०२०)** : (१) कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे मुंबई, ठाणे व पुणे या प्रमुख महानगरामधील दैनंदिन व्यवहार बंद झाल्याने पिशवीबंद दूध व ठोक विक्रीमध्ये घट झाली आहे. परंतु दररोज ३५ लाख लिटर दूध विक्रीविना राहत आहे हे खरे नाही.

(२) कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेल्या विपरीत परिस्थितीत ही राज्यातील दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने दिनांक ०३/०४/२०२० च्या शासन निर्णयान्वये अतिरिक्त ठरणाऱ्या दूधापैकी प्रति दिन १० लक्ष लिटर दूधाचे रुपांतरण दूधभुकटी करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या शासन निर्णयामध्ये ३.५/८.५ या गुणप्रतिकरीता शासनाच्या निर्धारित दराप्रमाणे रुपये २५/- प्रति लिटर प्रमाणे दर निश्चित करण्यात आला होता. तथापि, अन्न व सुरक्षा मानके यांनी निर्धारित केलेल्या ३.२/८.३ या गुणप्रतिनुसार दूध स्वीकृतीचे निर्देश असल्याने वरीलप्रमाणे दिनांक २७/०४/२०२० च्या शासन निर्णयान्वये फॅट व एसएनएफ मध्ये कपात करून सुधारीत दर देण्यात आले आहेत. यामध्ये ३.५/८.५ या गुणप्रतिपेक्षा अधिक फॅट व एसएनएफ साठी प्रचलित शासन धोरणानुसार अधिकचा दर देण्यात येईल असे नमुद करण्यात आलेले आहे.

(३) राज्यातील लॉकडाऊन परिस्थितीत निर्माण झालेल्या अतिरीक्त दूधाचे दूध भुकटी व देशी कुकिंग बटरमध्ये रुपांतरण करण्यास शासनाने दिनांक ०३/०४/२०२० व दिनांक २७/०४/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेमध्ये शासकीय दूध योजना व सहकारी दूध संघ यांचेकडील प्रतिदिन १० लक्ष लिटर दूधाची स्वीकृती मर्यादा निश्चित

करुन अतिरिक्त दूध स्वीकृत केले आहे. राज्यातील खाजगी दूध प्रकल्पांनी त्यांचेकडील दूध हे पिशवीबंद दूध व दुग्धजन्य पदार्थ निर्मिती व वितरण करून उर्वरित दूध हे खाजगी दूध भुकटी प्रकल्पांना पुरवठा केला आहे. त्यामुळे राज्यात दूध विक्रीविना पडून राहिल्याचे आढळून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२४) ३६१० (२८-०५-२०२०). डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ५१० ला दिनांक १३ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील उपशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी, राजपत्रित अधीक्षक, कक्ष अधिकारी या पदावर प्रभारी कार्यरत असल्याने येथील कर्मचाऱ्यांवर कोणतेही नियंत्रण राहत नसल्यामुळे विभागातील कामकाजावर त्याचा विपरीत परिणाम होत असल्याचे माहे एप्रिल, २०२० च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार सदर विभागातील सर्व महत्त्वाची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०५-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) प्राथमिक शिक्षण विभागातील, उपशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी ही पदे रिक्त असून सदर पदाचे अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आले आहेत. तसेच अधीक्षक राजपत्रित अधिकाऱ्यांची दोन पदे असून एका पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात

आला आहे. सरळसेवेने भरावयाच्या पदावर वित्त विभागाने तसेच पदोन्नतीने भरावयाच्या पदावर सामान्य प्रशासन विभागाने मर्यादा आणली असल्यामुळे सदर संवर्गातील काही पदे रिक्त आहेत. रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हयातील अवैध वाळू उत्खनन रोखण्याबाबत

**(२५) ३६१८ (०३-०६-२०२०). श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील सर्वत्र विशेषत: दापोली, चिपळूण, गुहागर तालुक्यात मागील १-२ वर्षापासून वाळू माफिया महसूल प्रशासन अधिकाऱ्यांच्या संगनमताने अवैधरित्या वाळू उत्खनन करुन वाहतूक करीत असल्यामुळे शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील दाभोळ खाडीमध्ये भोपण आणि दाभिळ पांगरी भागात महसूल प्रशासनाच्या संगनमताने मागील १ वर्षापासून संक्शन पंप व ड्रेझरच्या सहाय्याने सर्रासपणे दिवसरात्र अवैध वाळू उत्खनन व वाहतूक वाळू माफियांकडून होत असून सुमारे ५०० ब्रास वाळूचे दररोज उत्खनन करुन वाळू मंडणगड, दापोली व खेड आदी तालुक्यात पुरविली जात आहे, तसेच गुहागर व चिपळूण तालुक्यातील खाडीपट्टयात मागील २ वर्षापासून राजरोसपणे अवैध वाळू उत्खनन व वाहतूक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवैध वाळू उत्खनन करणाऱ्यांकडे महसूल प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याने वाळू माफियांना अभय मिळत असून अवैध वाळू उत्खनन करणाऱ्यावर कारवाई करुन वाळू उत्खनन रोखण्याबाबत पर्यावरणप्रेमी व स्थानिकांनी मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री, मा.पालकमंत्री, जिल्हाधिकारी, रत्नागिरी व तहसिलदार, गुहागर व चिपळूण यांचेकडे माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे तक्रारी करुनही वाळू माफियांविरूध्द कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध वाळू उत्खनन रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०३-०८-२०२०) :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३) व (४) मौजे गोवळकोट, कालुस्ते, मिरजोळी, चिवेली, मालदोली या भागात अनधिकृत वाळू उपसा होत असल्याबाबत मा.मंत्री (महसूल) यांचेकडे निनावी तक्रार माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये प्राप्त झाली होती. सदर तक्रार अर्ज जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे चौकशीकामी पाठविण्यात आला आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीवर आळा घालण्याकरीता जिल्हा, उपविभागीय व तालुकास्तरावर भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. सदर पथकामार्फत सन २०१८-२०१९ मध्ये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या प्रकरणी दंडात्मक कारवाई करुन रुपये ७८.४० लक्ष इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे व २ प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच सन २०१९-२०२० मध्ये दंडात्मक कारवाई करुन रुपये ४८.७४ लक्ष इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे व ४ प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## साखर उद्योगास राज्य शासनाकडून मदत मिळणेबाबत

**(२६) ३८८४ (१५-०७-२०२०). श्री.जयंत पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर, श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी गत दीड महिन्यापासून सुरू असणाऱ्या लॉकडाऊनचा कुठलाच परिणाम साखरेच्या उत्पादनावर झाला नसला तरी राज्यातील अनेक साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांची FRP ची रुपये ३७८० कोटीची रक्कम थकविली असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साखरेची विक्री होत नसल्याने कारखान्यात हजारो टन पोती साखर पडून असल्याने शेतकऱ्यांना FRP ची रक्कम वाढत जाऊन अठरा हजार कोटी रुपयांपर्यंत पोहचली असून ८०% कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची FRP ची रक्कम थकविली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गत दोन वर्षात साखर कारखान्यांनी उत्पादित केलेल्या साखरेची पोती गोडावूनमध्ये शिल्लक असल्याने कारखान्याने उत्पादित साखरेपोटी बँकेकडून घेतलेल्या कर्जाचे व्याज वाढत असल्याने साखर उद्योग आर्थिक अडचणीत आला असून राज्य शासनाकडून साखर कारखान्याना आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी कोणते धोरण राबविण्यात येणार आहे तसेच शेतकऱ्यांची आर्थिक अडचण सोडवून त्यांना FRP ची रक्कम मिळवून देण्यासंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२७-०७-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

हंगाम २०१९-२०२० मध्ये राज्यातील साखर कारखान्यांनी ५५०.१३ लाख मे.टन ऊसाचे गाळप केलेले आहे. ऊस पुरवठादारांनी पुरविलेल्या ऊसाचे नियमानुसार देय FRP रुपये १३२९६.४९ कोटी ऊस किंमत होती. त्यापैकी कारखान्यांनी ऊस पुरवठादारांना रुपये १२८६६.४९ कोटी रक्कम अदा केली असून दिनांक ३१/०५/२०२० अखेर प्राप्त अहवालानुसार ३८ कारखान्यांकडे नियमानुसार रुपये ४७१.९३ कोटी रक्कम थकित आहे. त्यानंतर दिनांक १५/०७/२०२० अखेर रुपये १९३.५२ कोटी (१.४०%) रक्कम थकीत राहिली आहे.
(२) अंशत: खरे आहे.

गळीत हंगाम २०१९-२०२० चे सुरुवातीस राज्यात ६३.४४ लाख मे.टन शिल्लक साखर साठा होता. तद्नंतर दिनांक १५ मे, २०२० अखेर ८४.५१ लाख मे.टन साखर साठा शिल्लक आहे.

कोरोना-१९ या साथीच्या प्रादुर्भावामुळे देशात लॉकडाऊन माहे मार्च, २०२० पासून सुरु झालेले आहे. त्यामध्ये देशांतर्गत आणि परदेशात साखर विक्री करताना अनेक अडचणी आलेल्या आहेत. केंद्र शासनाने जाहीर केलेल्या मंथली रिलीज ऑर्डर्सनुसार साखर विक्री लॉकडाऊनपूर्वी होत नव्हती आणि

काही प्रमाणात साखर साठा शिल्लक राहत होता. राज्यातील साखर कारखान्यांनी साखर निर्यातीबाबत १४.३३ लाख मे.टन साखरेचे करार केले आहेत. परंतु प्रत्यक्षात १२.६६ लाख मे.टन साखरेची निर्यात झालेली आहे. १.६७ लाख मे.टन साखर निर्यात करार होवूनही निर्यात झालेली नाही.

हंगाम २०१९-२०२० मधील थकीत FRP बाबत साखर आयुक्तालयाचे व प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालयाचे स्तरावरुन शेतकऱ्यांची ऊसाचे देयके अदा करणेसंदर्भात संबंधित साखर कारखान्यांकडे सतत पाठपुरावा केल्याने कारखान्यांनी नियमानुसार देय असलेल्या FRP च्या ९८.६०% FRP अदा केलेली आहे.

(३) गत दोन वर्षात राज्यातील साखर कारखान्यांना आर्थिक अडचणीचेवेळी शेतकऱ्यांची FRP ची रक्कम अदा करता यावी, यासाठी केंद्र शासनामार्फत व राज्य शासनाकडून खालील उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

१. केंद्र शासनामार्फत बफर स्टॉक अनुदान योजना जाहीर करुन सन २०१८-२०१९ च्या पहिल्या त्रैमासिकमध्ये १३६ कारखान्यांना रुपये ९०.६७ कोटी, दुसऱ्या त्रैमासिकमध्ये रुपये ८२.८७ कोटी व तिसऱ्या त्रैमासिकमध्ये आतापर्यंत रुपये ३४.३७ कोटी दिलेले आहेत. केंद्र शासनाकडून साखर कारखान्यांना अनुदान रक्कम वितरीत करावयाचे काम चालू आहे. सन २०१९-२०२० मध्ये एकूण रक्कम रुपये २४० कोटी द्यावयाची आहे.

२. केंद्र शासनाकडील साखर निर्यात अनुदान योजनेनुसार सन २०१८-२०१९ मध्ये आतापर्यंत ५९ साखर कारखान्यांना रुपये ३९८.३७ कोटी दिलेले आहेत. उर्वरित रक्कम केंद्र शासनाकडून साखर कारखान्यांना वितरीत करावयाचे काम चालू आहे.

३. केंद्र शासनाकडील वाहतूक अनुदान योजनेनुसार सन २०१८-२०१९ मध्ये आतापर्यंत ५८ कारखान्यांना रुपये १०५.५४ कोटी दिलेले आहेत. उर्वरित रक्कम केंद्र शासनाकडून साखर कारखान्यांना वितरीत करावयाचे काम चालू आहे.

४. सॉफ्ट लोन योजना-२०१९ या योजनेनुसार हंगाम २०१७-२०१८ मध्ये उत्पादित केलेल्या पांढऱ्या साखरेच्या १०.५५% साखर साठ्यावर रुपये ३१०००/- मे.टन या दराने येणारी रक्कम

कारखान्यांना कर्ज स्वरुपात बँकांकडून उभारणेस मान्यता देण्यात आली. या योजनेंतर्गत १४० कारखान्यांना रुपये २९११.३९ कोटीचे कर्ज मंजूर झाले. यापैकी १३९ कारखान्यांना रुपये २९००.९२ कोटीचे कर्ज वितरीत झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली वनवृत्तांतर्गत कुरखेडा वन परिक्षेत्रामधील कोल्हापूरी बंधाऱ्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२७) ४०३१ (१७-०७-२०२०). श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली वनवृत्तांतर्गत कुरखेडा वन परिक्षेत्रामधील चांदगड क.न. ११२१ (पी.एफ.) मधील नाल्यावर कोल्हापूरी बंधाऱ्याचे काम लघुपाटबंधारे विभाग, जालना येथील कन्स्ट्रक्शन कंपनीला देताना वन विभागाची परवानगी न घेता संबधीत वन अधिकारी व लघुपाटबंधारे विभाग यांनी संगनमत करुन अनधिकृतपणे कंत्राटदारांना सदर कंत्राट दिले असल्याचे दिनांक २६ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागाचे क्षेत्र असतांना वन विभागाची रितसर परवानगी घेवूनच कंत्राट देणे आवश्यक असतानाही कोणतीही कागदपत्राची पूर्तता न करता सदर प्रकरणात लाखोचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख (०१-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) कामाचे स्थळ ठरविताना दोन्ही बाजूला वन विभागाची जमीन येत नाही याची शहानिशा करुनच प्रकल्पस्थळ ठरविण्यात येते. मौजा सालईटोला

येथील बांधकामाचे स्थळ ठरविताना ही खबरदारी घेण्यात आलेली आहे. तसेच स्पर्धात्मक निविदाव्दारे सदर काम देण्यात आलेले आहे.

तथापि एप्रिल महिन्यात सदर बांधकाम स्थळ वन विभागात येत असल्याची वन विभागास शंका निर्माण झाली होती. परंतू वन विभागाच्या सर्वेक्षणाअंती सदर स्थळ राखीव वनात येत नसून महसूल विभागाच्या क्षेत्रात येते ही बाब सिध्द झाली आहे.

चेक डॅमचे बांधकाम प्रत्यक्ष नाल्यात करण्यात येते. सदर नाल्याच्या तीरावर गट क्र.४६ व गट क्र.४८ ही शेतजमीन आहे. त्यामुळे हे क्षेत्र महसूल विभागाच्या अंतर्गत येते. वन विभागाच्या क्षेत्रात कुठलेही बांधकाम करण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठवाड्यातील जमिनीची धूप थांबविण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(२८) ४०३२ (१६-०७-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मृद व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब न केल्यामुळे मराठवाड्यातील जमिनीची धूप ४.६० टन प्रति हेक्टर झाल्याचे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील अखिल भारतीय समन्वयीन कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पाव्दारे अभ्यास केल्यानंतर निदर्शनास आले असून त्याबाबत सविस्तर अहवाल माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अहवालाच्या अनुषंगाने मराठवाड्यातील लातूर, उस्मानाबाद, बीड व जालना या जिल्ह्यातील जमिनीचा मोठया प्रमाणावर धूप होत असून सदर जमिनीची धूप थांबविण्यासाठी शासनस्तरावर

उपाययोजना करण्यात येत नसल्याने मराठवाडयाचे वाळंवट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पावसाळ्यात मराठवाड्यामध्ये मोठ्या प्रमाणावर जमिनीची धूप होत असल्याने जमिनीची धूप थांबविण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे, असे शासनाला सादर केलेल्या अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जमिनीची धूप थांबविण्यासाठी आजमितीस निधीची तरतूद करण्यास तसेच मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील मृद विज्ञान व कृषी रसायन शास्त्राचे डॉ.प्रविण वैद्य यांनी स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठवाड्यातील जमिनीची धूप थांबविण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१४-१०-२०२०) :** (१) होय, मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी विद्यापीठाने दिनांक ३ डिसेंबर, २०१९ रोजीच्या पत्रान्वये मृदाधूपबाबत सर्वंकष अभ्यास करण्यासाठी विद्यापीठस्तरावर गठीत केलेल्या समितीचा अहवाल शासनास सादर केला आहे.

(२) नाही, हे खरे नाही. सद्य:स्थितीत प्रश्नामध्ये दर्शविल्याप्रमाणे परिस्थिती नाही.

(३) होय.

(४) नाही, हे खरे नाही.

(५) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी विद्यापीठाकडून मृदाधूपबाबत सर्वंकष अभ्यास करण्यासाठी विद्यापीठस्तरावर गठीत समितीने सादर केलेला अहवाल पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी मृद व जलसंधारण विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे.

(६) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## मुंबई, ठाणे व पुण्यातील सुरक्षारक्षक मंडळाच्या अधिकारी/कर्मचारी यांना विमा कवच लागू करण्याबाबत

**(२९) ४०६१ (१७-०७-२०२०). श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह ठाणे व पुण्यातील सुरक्षारक्षक मंडळाच्या अधिकारी/कर्मचारी यांना विमा कवच लागू करण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्यामुळे राज्यातील सुमारे १ लाख ७३ हजार ४० सुरक्षारक्षकांची कुटुंबे मदतीच्या प्रतिक्षेत असून अत्यावश्यक सेवेत समाविष्ट करण्यात आलेल्या शासन संचालित महाराष्ट्र सुरक्षारक्षक मंडळातील २२००० सुरक्षारक्षकांना कोणत्याही प्रकारचे विमा संरक्षण देण्यात आले नसल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील केईएम रुग्णालयापासून वाशी येथील एपीएमसी मंडईसारख्या शहरासह उपनगरातील महत्वाच्या आणि गर्दीच्या ठिकाणी सुरक्षा पुरवण्याची जबाबदारी मंडळाच्या सुरक्षारक्षक व अधिकाऱ्यांवर आहे. राज्य शासनाने सुरक्षारक्षक मंडळातील रक्षक व अधिकारी यांना अत्यावश्यक सेवेत अंतर्भूत करत कोणत्याही परिस्थितीत कामावर रुजू होण्याचे आदेश लॉकडाऊनवेळी दिले होते व त्यानुसार तुटपुंज्या पगारावर काम करणाऱ्या सुरक्षारक्षकांनी देशसेवेसाठी कोणताही विचार न करता कामावर रुजू होण्याचा निर्णय घेतला, मात्र एकीकडे राज्य शासकीय कर्मचारी व महानगरपालिका स्तरावरील कर्मचाऱ्यांना दिवसा रुपये ३००/- अतिरिक्त भत्ता देत असताना, सुरक्षारक्षकांना महिन्याला फक्त एक हजार रुपये अतिरिक्त भत्ता दिला जात असून अतिरिक्त भत्त्याची तरतूदही मंडळाच्या स्वत:च्याच निधीतून केली. या उलट सुरक्षारक्षकांच्या विमा कवचाची रक्कम शासनाने भरावी, असे ठरले. तसा प्रस्तावही मंडळाने शासनाकडे पाठवला असून सुरक्षारक्षकांना विमा कवच लागू झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना विषाणूच्या लढाईत सहभागी असणाऱ्या विशेषत: अत्यावश्यक सेवेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासनाने पन्नास लाख रुपयाचे विमा संरक्षण दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, लॉकडाऊनच्या काळात सेवेत असलेल्या सुरक्षा मंडळांच्या १३ कर्मचाऱ्यांसह अधिकाऱ्यांचा मृत्यू ओढवलेला असतानाही, विमा कवचाचा प्रस्ताव मंजूरी अभावी प्रलंबित असल्याने सुरक्षारक्षकाची कुटुंबे शासनाच्या मदतीच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सुरक्षा मंडळातील सुरक्षारक्षक कर्मचारी व अधिकाऱ्यावरील अन्याय दूर होण्याच्यादृष्टीने तसेच विमा कवच लागू करण्याचेदृष्टीने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१२-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

राज्य शासनाने स्थापित केलेल्या १५ सुरक्षारक्षक मंडळांपैकी १० सुरक्षारक्षक मंडळातील सुरक्षारक्षकांना कामगार राज्य विमा योजना (ई एस आय एस) लागू असून या योजनेंतर्गत मिळणारे सर्व विमा व वैद्यकीय लाभ मंडळांच्या सुरक्षारक्षकांना उपलब्ध आहेत. याशिवाय बहुतांश मंडळांनी त्यांच्या आर्थिक क्षमतेनुसार सुरक्षारक्षकांना वैयक्तिक अपघात विमा संरक्षण उपलब्ध करून दिलेले आहे.
(२) हे खरे नाही.

सुरक्षारक्षक मंडळांनी त्यांच्या आर्थिक क्षमतेनुसार लॉकडाऊन कालावधीत कार्यरत सुरक्षारक्षकांना अतिरिक्त वाहन भत्ता देण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावांना शासनाकडून मंजूरी देण्यात आलेली आहे.

सुरक्षारक्षकांच्या विमा कवचाची रक्कम शासनाने भरावी असा कोणताही प्रस्ताव सुरक्षारक्षक मंडळांकडून प्राप्त झालेला नाही.
(३) वित्त विभागाच्या दिनांक २९/०५/२०२० च्या शासन निर्णयानुसार कोविड विषाणू सार्वत्रिक साथीच्या अनुषंगाने सर्वेक्षण, शोध, माग काढणे, प्रतिबंध चाचणी, उपचार व मदत कार्य या कार्यवाहीशी संबंधित कर्तव्यावर कार्यरत असणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना रुपये ५० लक्ष रकमेचे सर्वकष वैयक्तिक अपघात विमा कवच व सानुग्रह सहाय्य लागू करण्याबाबत निर्णय झालेला आहे.

(४) व (५) कोविड सार्वत्रिक साथीत कर्तव्यावर असलेल्या नोंदीत व कार्यरत सुरक्षारक्षकांना विमा कवच पुरविण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला नाही.

तथापि, सुरक्षारक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षारक्षकांच्या जागी अनुकंपा तत्वावर त्यांच्या नातेवाईकाची नियुक्ती करण्याबाबतचे निकष ठरविण्याबाबत दिनांक १५ जुलै, २००९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार अनुकंपा तत्वावर सुरक्षारक्षक नोंदणीसाठी प्राप्त झालेल्या ३ अर्जांपैकी १ सुरक्षारक्षकाच्या वारसास सेवेत सामावून घेणेबाबत नोंदणी करण्यात आलेली असून उर्वरित २ सुरक्षारक्षकांच्या नोंदणी करण्याबाबतच्या अर्जावर मंडळस्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे वेंगणी (ता.जि.पालघर) येथे घातक केमिकलचा साठा आढळल्याबाबत

**(३०) ४०६७ (१५-०७-२०२०). श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वेंगणी (ता.जि.पालघर) येथे घातक केमिकलचा साठा माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान आढळला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, पालघर यांनी वित्त व जिवितहानीचा धोका निर्माण झाल्याने दिनांक २५ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास बंदीचा आदेश दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (०८-०९-२०२०) :** (१) होय.

(२) होय.

(३) प्रस्तुत प्रकरणी तारापूर पोलीस ठाणे येथे १) निखिल दिनेश बोरे, २) परशुराम दत्तात्रेय संखे, ३) दिपीका दिनेश बोरे, सर्व रा.वेंगणी, ता.जि.

पालघर यांचेविरूध्द गु.रजि.क्र.३१/२०२० कलम भा.दं.वि.सं. २६८, २८४, २८५, ३४ प्रमाणे दिनांक २६/६/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला असून गुन्हयाचा तपास सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सर्व कापूस खरेदी केंद्र सुरू करण्याबाबत

**(३१) ४०७७ (१५-०७-२०२०). श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सुमारे अडीच लाख कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा एक कोटी क्विंटल कापूस विक्री अभावी घरीच पडून असल्याचे माहे मे, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रचलित दरानुसार राज्यातील शेतकऱ्यांकडील कापसाची किंमत रुपये सात हजार कोटी एवढी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोरोना विषाणू महामारीच्या संकटामुळे बाजारात आलेल्या मंदीमुळे खाजगी कारखानदार व्यापारी खरेदीला तयार नसून खरेदी संथगतीने सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, खरेदी केंद्र १००% सुरू न झाल्यास व कापसाची वेळेत खरेदी न झाल्यास कापूस उत्पादक शेतकरी संकटात सापडण्याची भिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कापूस खरेदी केंद्रे तात्काळ सुरू करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२७-०७-२०२०) :** (१) व (२) होय, अंशत: खरे आहे.

हंगाम २०१९-२०२० साठी केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किमान हमी दराने राज्यामध्ये कापसाची केंद्र शासनाच्या मुख्य अभिकर्ता भारतीय कपास

निगम लिमिटेड (सीसीआय) यांच्याव्दारे माहे नोव्हेंबर, २०१९ पासून कोविड-१९ च्या प्रादुर्भावापूर्वी ८४ खरेदी केंद्रांवर १८१ जिनिंग प्रेसिंग फॅक्ट्रीमध्ये एकूण ९१.९० लक्ष क्विंटल कापसाची खरेदी झालेली आहे. तसेच, सीसीआयचे उप अभिकर्ता म्हणून कापूस पणन महासंघाव्दारे कोविड-१९ च्या प्रादुर्भावापूर्वी ७४ खरेदी केंद्रांवर १२७ जिनिंग प्रेसिंग फॅक्ट्रीवर एकूण ५४.०३ लक्ष क्विंटल कापसाची खरेदी केलेली होती. परंतु, कोविड-१९ आजाराच्या संक्रमणामुळे राज्यात दिनांक २४ मार्च, २०२० रोजी केलेल्या टाळेबंदीमुळे केंद्र शासनाच्या निर्देशानुसार किमान हमी दराने सुरु असलेली कापूस खरेदी केंद्र पूर्णतः बंद ठेवावी लागल्यामुळे शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करता आला नाही. तथापि, लॉकडाऊनच्या कालावधीत केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाने शेतमालाची हमी भावाने खरेदी करण्यास परवानगी दिल्यानंतर सीसीआय यांच्याव्दारे एकूण ९० कापूस खरेदी केंद्रावर २३७ जिनिंग फॅक्टरीमध्ये तसेच त्यांचे उप अभिकर्ता म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघव्दारे सद्य:स्थितीत ८९ खरेदी केंद्रावर १७६ जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीमध्ये कापसाची खरेदी करण्यात येत आहे. दिनांक २२ जुलै, २०२० अखेर सीसीआयव्दारे एकूण ५,३०,४३८ शेतकऱ्यांकडून १२७.६८ लाख क्विंटल तर कापूस पणन महासंघाकडून एकूण ३,३३,६३४ शेतकऱ्यांकडून एकूण ९१.१३ लाख क्विंटल कापसाची खरेदी झालेली आहे. या कापसाचे खरेदीचे मूल्य रुपये ११,३२०.९० कोटी असून रुपये १०,७५२ कोटी रक्कम अदा करण्यात आलेले आहेत.

(३) अंशत: खरे आहे.

सीसीआयव्दारे एकूण ९० कापूस उत्पादक तालुक्यात २३७ जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीमध्ये तर कापूस पणन महासंघाव्दारे एकूण ८९ कापूस उत्पादक तालुक्यात १७६ जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीमध्ये किमान आधारभूत दराने कापूस खरेदी केली जात आहे अशा एकूण १७९ कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये (कापूस उत्पादक क्षेत्र जास्त असलेल्या तालुक्यामध्ये) ४०७ जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीमध्ये केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार FAQ दर्जाच्या नोंदणीकृत शेतकऱ्यांच्या कापसाची किमान हमी दराने खरेदी केली जात आहे.

(४) नाही, हे खरे नाही.

सीसीआयने दिनांक ३० सप्टेंबर, २०२० पर्यंत FAQ. दर्जाचा कापूस हमीभावाने खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे सर्व एफएक्यू दर्जाचा कापूस खरेदी केली जाईल.

(५) सीसीआय तसेच कापूस पणन महासंघाव्दारे कोविड-१९ नंतर पावसाळ्यापूर्वी कापसाची खरेदी पूर्ण करता यावी, यासाठी जास्तीची खरेदी केंद्र व जिनिंग फॅक्टरी यामध्ये खरेदी सुरु केली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेश निर्गमित करूनही बढत्यांमधील आरक्षण देण्यास विलंब होत असल्याबाबत

**(३२) ४०९४ (१७-०७-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.सर्वोच्च न्यायालयाने बढत्यांमधील आरक्षणासंदर्भात दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या निकालात बढत्यांमध्ये आरक्षण देण्याची तरतूद केली असून मागासलेपणा आणि योग्य प्रतिनिधित्व नसेल तर आरक्षण देता येईल असेही निकालात नमूद करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पदोन्नतीच्या प्रक्रियेस दिलेली स्थगिती उठविल्याबाबतचे आदेश निर्गमित करूनही शासन बढत्यांमधील आरक्षण देण्यास विलंब करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानपरिषदेत सादर करण्यात आलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना मा.मुख्यमंत्री महोदयांनी उक्त प्रकरणाची चौकशी करून सदर प्रश्न सोडविण्यात येईल असे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार राज्यातील बढत्यांमधील आरक्षणाबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१७-०९-२०२०) :** (१) मा.सर्वोच्च न्यायालयाने एम.नागराज प्रकरणी दिनांक १९/१०/२००६ रोजी दिलेल्या निर्णयाचा फेरविचार करण्याची आवश्यकता नसल्याचा तसेच पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्यासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या मागासलेपणाची माहिती संकलित करण्याची आवश्यकता नसल्याचा निर्णय दिनांक २६/०९/२०१८ रोजी विशेष अनुमती याचिका क्र.३०६२१/२०११ (जर्नेलसिंग व इतर विरुध्द लक्ष्मीनारायण गुप्ता व इतर) यामध्ये दिलेला आहे.
(२) हे खरे नाही.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक ०४/०८/२०१७ च्या निर्णयास मा.सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली नसल्यामुळे राज्यात अद्याप मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचा दिनांक ०४/०८/२०१७ निर्णय लागू आहे. त्यामुळे राज्यात तूर्तास पदोन्नतीमध्ये आरक्षण देता येणार नाही, असे अभिप्राय महाधिवक्ता यांनी दिले आहेत.
(३) होय.
(४) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २६/०९/२०१९ च्या निर्णयास अनुसरुन राज्यात पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याची कार्यवाही करता येईल किंवा कसे याबाबत महाधिवक्ता यांचे कायदेशीर अभिप्राय घेण्यात आले असता, मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक ४/०८/२०२० च्या निर्णयास स्थगिती दिलेली नसल्यामुळे राज्यात पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याची कार्यवाही करता येणार नाही, असे अभिप्राय दिले आहेत. राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयानंतरच याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील महावितरण कंपनीमध्ये विविध पदे रिक्त असल्याबाबत

**(३३) ४११० (३१-०७-२०२०). श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.निलय नाईक : तारांकित प्रश्न क्रमांक ३६ ला दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक २८ मे, २०२० रोजीच्या स्थितीनुसार महावितरणमध्ये वर्ग-१ ते वर्ग-४ पर्यत ८१ हजार ६२७ पदे मंजूर असून त्यापैकी २५ हजार ८१८ पदे रिक्त असल्याचे दिनांक १४ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज मंडळाने नुकताच नोकर भरतीचा कार्यक्रम हाती घेतला असून सहाय्यक अभियंता पदासाठी (GATE) गेट परिक्षेच्या गुणवत्तेनुसार जागा भरण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शास्त्रज्ञ पदाच्या निवडीसाठी किंवा पदव्यूत्तर शिक्षण घेण्यासाठी गेट (GATE) परिक्षा घेतली जात असुन अशा प्रकारच्या निर्णयामुळे राज्यातील पात्र उमेदवारावर अन्याय होण्याची शक्यता आहे तसेच गेट परिक्षेच्या पुर्व तयारीसाठी महाराष्ट्रात कोचिंग क्लासेस नसल्याने हैद्राबाद, दिल्ली व कोटा येथे लाख ते दिड लाख शुल्क भरुन कोचिंग क्लासेस महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना करावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील विद्यार्थ्यांना नोकऱ्या उपलब्ध होण्यासाठी गेट (GATE) परिक्षेची अट रद्द करुन पूर्वीप्रमाणे विभागामार्फत नोकर भरती प्रक्रिया करण्यासाठी व सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (०६-१०-२०२०) :** (१) महावितरण कंपनीमध्ये वर्ग-१ ते वर्ग-४ मधील एकूण ८१,७०३ पदे मंजूर असून, २६,८५० पदे रिक्त आहेत.

(२), (३) व (४) महावितरण कंपनीमधील "सहाय्यक अभियंता" ही पदे सन २०२० पासून Graduate Aptitude Test in Engineering (GATE) या

परीक्षेमध्ये प्राप्त झालेल्या गुणानुसारच भरण्याचा निर्णय कंपनीचा मंडळ ठराव क्र.१५९८, दिनांक ३० जानेवारी, २०१९ अन्वये घेण्यात आला होता. तथापि, जाहिरात क्र.०१/२०२० अन्वये “सहाय्यक अभियंता” पदे भरताना विशेष बाब म्हणून सदर भरती GATE परिक्षेच्या गुणवत्तेनुसार न करण्याचा निर्णय घेण्यात आला.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय वसतिगृहात (ता.महागाव, जि.यवतमाळ) विद्यार्थीनीचा संशयास्पद मृत्यू झाल्याबाबत

**(३४) ४१३० (२०-०७-२०२०). डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.सुरेश धस, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील अनुसूचित जाती-जमाती मुलींच्या निवासी शासकीय वसतिगृहात विद्यार्थीनीचा दिनांक १३ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास संशयास्पद मृत्यू झाल्याच्या घटनेप्रकरणी महागाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून मृत विद्यार्थीनीचे मणक्याला जबर दुखापत, गळ्याला व दोन्ही हातांना ओरबडल्याच्या जखमा दिसत असल्याने सदरहू मृत विद्यार्थीनीचे ऑन कॅमेराव्दारे शवविच्छेदन करण्याची मागणी पिडित मुलीच्या वडिलांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (२७-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे.महागांव, जि.यवतमाळ येथे अकस्मात मृत्यू क्रमांक ५/२० क्र. १७४ सीआरपीसी अन्वये दिनांक १३/०३/२०२० रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्हयात आतापर्यंतच्या तपासात असे आढळून आले आहे की, कु.शिवामी दत्ता वाघमारे, वय १३ वर्ष, रा.कलगांव, ता.महागांव ही विद्यार्थीनी महागांव,

जि.यवतमाळ येथे अनुसूचित जाती जमाती मुलींचे निवासी शासकीय वसतिगृहात इयत्ता सातव्या वर्गात शिकत असून दिनांक १३/०३/२०२० रोजी सकाळी वसतिगृहाच्या आवारातील लोखंडी एस आकाराचे खेळण्यावरून खाली जमिनीवर पडून तिचे डोक्याला व मानेवर मार लागून बेशुध्द झाली. तिला उपचारासाठी ग्रामीण रूग्णालय, सवना, ता.महागांव येथे भरती केले असता उपचारादरम्यान मरण पावली. मृतकचे शवविच्छेदन श्री.वसंतराव नाईक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथे ईनकॅमेरा करण्यात आले. वैद्यकीय अधिकारी यांनी तिचे मरणाबाबत Sub-arachonoid hemorrhanges with e/o multiple injuries over body असा अभिप्राय दिला आहे. सदर प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून तपासाअंती निष्पन्न होणाऱ्या बाबींवरून पुढील आवश्यक कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जेष्ठ नागरीकांच्या कल्याणासाठी केंद्र शासनाने केलेल्या कायद्याच्या अंमलबजावणी करण्याबाबत

**(३५) ४१५९ (२३-०४-२०१५). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे** : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वृध्द नागरिकांच्या कल्याणासाठी केंद्र शासनाने केलेल्या (दि मेटनन्स ॲण्ड वेल्फेअर ऑफ पॅरन्टस ॲण्ड सिनियर सिटीझन्स ॲक्ट, २००७) या कायद्याची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी झाली नसल्यामुळे अंमलबजावणी संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे याबाबतची माहिती सादर करावी असे निर्देश मा.उच्च न्यायालयाने एका याचिकेच्या अनुषंगाने सामाजिक न्याय विभागाच्या प्रधान सचिवांना दिलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कायद्याच्या तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाची भूमिका काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२०-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) केंद्र शासनाच्या आई-वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याण अधिनियम २००७ (२००७ चा ५६) च्या कलम ३२ व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र राज्यात आई-वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम, २०१० तयार करण्यात आले आहे. सदर अधिनियमाच्या तरतुदीनुसार खालीलप्रमाणे अंमलबजावणी करण्यात आली आहे.

i) सदर अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनाने मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ नागरिक कार्यकारी समिती तसेच मा.मंत्री (सा.न्या.) यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य ज्येष्ठ नागरिक परिषद समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच जिल्हा समितीची संरचना करण्यात आली आहे.

ii) महसूल व वन विभागामार्फत दिनांक २८/०९/२०१० च्या अधिसूचनेव्दारे राज्यातील सर्व जिल्ह्याच्या प्रत्येक उपविभागासाठी न्यायाधिकरण गठीत करण्यात आले आहे व उक्त न्यायाधिकरणासाठी निर्वाह खर्चाबाबत निर्णय देण्यासाठी पिठासीन अधिकारी म्हणून संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

iii) अधिनियम, २००७ (२००७ चा ५६) च्या कलम १८ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार दिनांक ४ मे, २०११ च्या अधिसूचनेनुसार ज्येष्ठ नागरिकांची इच्छा असल्यास त्यांची निर्वाह न्यायाधिकरण किंवा अपिलीय न्यायाधिकरणात बाजू मांडण्यासाठी सर्व जिल्ह्यांच्या विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांची निर्वाह अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहेत.

iv) ज्येष्ठ नागरिक धोरण-२०१३, दिनांक ३०/०९/२०१३ रोजी मंजूर करुन सदर धोरणाच्या अंमलबजावणीबाबत दिनांक ९ जुलै, २०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयात नमूद बाबींसाठी ज्येष्ठ नागरिकांची वयोमर्यादा ६० वर्षे करण्यात आली आहे.

v) ज्येष्ठ नागरिकांच्या योजनांसाठी वयोमर्यादा ६५ वरुन ६० करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## राज्य मराठी विकास संस्थेमार्फत भरती प्रक्रियेत अनियमिता झाल्याबाबत

**(३६) ४१६० (१७-०७-२०२०). श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मराठी विकास संस्थेतर्फे राज्याच्या सर्व जिल्ह्यांमधून १२ विभागीय समन्वयक पदासाठी कंत्राटी पध्दतीने करण्यात आलेल्या भरती प्रक्रियेतील परीक्षेत यशस्वी ठरलेले उमेदवार व संस्थेकडून निवड झालेले उमेदवार यात तफावत असल्याची बाब माहे जून, २०२० च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने भरती प्रक्रियेत अनियमितता करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (०१-१०-२०२०) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) राज्य मराठी विकास संस्थेची स्थापना दिनांक ३०/०४/१९९२ च्या शासन निर्णयानुसार करण्यात आली आहे. सदर संस्था नोंदणी अधिनियमानुसार (संस्था नोंदणी अधिनियम १८६०) नोंदणीकृत स्वायत्त संस्था आहे. संस्थेचे कामकाज संस्थेच्या घटनेनुसार चालते.

राज्य मराठी विकास संस्था स्वायत्त संस्था असल्यामुळे तसेच त्याचे कामकाज नियामक मंडळ/कार्यकारी समितीच्या मान्यतेनुसार चालत असल्याने, समन्वयक पदांच्या अनियमिततेच्या अनुषंगाने अहवाल कार्यकारी समितीच्या निदर्शनास आणून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना राज्य मराठी विकास संस्थेस देण्यात आल्या होत्या. दरम्यानच्या काळात कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत कार्यकारी समितीची बैठक आयोजित करणे शक्य झाले नव्हते.

आता दिनांक ११/०८/२०२० रोजी संस्थेच्या कार्यकारी समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत तत्कालीन संचालकांच्या कार्यकाळात प्रशासकीय आणि आर्थिक अनियमितता झाल्या असल्याचे संस्थेच्यास्तरावर केलेल्या चौकशीत दिसून आले आहे. सबब, यासंदर्भात तत्कालीन संचालकांवरती उच्च व तंत्र शिक्षण या त्यांच्या मूळ विभागास या झालेल्या प्रशासकीय व वित्तीय अनियमितेबाबत अवगत करून मूळ विभागाच्या माध्यमातून तत्कालीन संचालकांवर कारवाई करण्याचे प्रस्तावित करण्यात यावे या प्रस्तावास कार्यकारी समितीव्दारे मान्यता देण्यात आली आहे.

संस्थेतील अनियमिततेच्या अनुषंगाने तत्कालीन संचालक यांचा अतिरिक्त कार्यभार यापूर्वीच काढून घेण्यात आला असून त्यांच्या सेवा मूळ कार्यालयास परत करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नरतवडे (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथील शेतकऱ्याने खाजगी सावकाराच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याबाबत

**(३७) ४१८१ (१७-०७-२०२०). श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरतवडे (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथे अशोक सुतार या शेतकऱ्याने खाजगी सावकाराच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली असल्याची दुर्दैवी घटना दिनांक ४ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आत्महत्या प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आणि सदर प्रकरणातील दोषी सावकाराविरुध्द शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०७-०८-२०२०) :** (१), (२) व (३) नरतवडे (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथील अशोक सुतार या शेतकऱ्यांने दिनांक १/६/२०१८ रोजी आत्महत्या केली. त्यानुषंगाने खाजगी सावकार श्री.रघुनाथ शिंदे यांचेविरुध्द राधानगरी पोलीस स्टेशन येथे एफ.आय.आर. क्र.००९५/२०१८, दिनांक १/६/२०१८ रोजी दाखल करण्यात आला.

वरील तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित खाजगी सावकाराविरुध्द महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील तरतूदीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून संबंधित सावकारास दिनांक १४/६/२०१८ रोजी अटक करण्यात आली होती. या प्रकरणी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण सद्य:स्थितीत जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर येथे न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत न मिळाल्याबाबत

**(३८) ४१९५ (१७-०७-२०२०). डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.सुरेश धस, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेती मालाला हमीभाव मिळत नसून बोंडअळीमुळे कापूस पिकाचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांमध्ये नैराश्य निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांमध्ये आत्महत्येचे प्रमाण वाढत असुन गत ४ वर्षात ११०९५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनाकडून जी मदत मिळते ती फक्त २६८८ कुटुबांनाच मिळाली असुन उर्वरित कुटुंबांना शासकीय मदत मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना देण्यात येणारी मदत वेळेवर मिळत नसल्यामुळे ते मदतीपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच शेतकरी आत्महत्या रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०२-११-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) नापिकी, राष्ट्रीयकृत किंवा सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड न करू शकल्याने होणारा कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या तीन कारणांसाठी केलेल्या शेतकरी आत्महत्या प्रकरणी शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २००६ नुसार रुपये १.०० लक्ष इतकी मदत देण्यात येते.

मागील ४ वर्षात एकूण ११६२५ आत्महत्यांची प्रकरणे आढळून आली. त्यापैकी ६८२० प्रकरणे जिल्हास्तरीय समितीने पात्र ठरविली असून ४३६० प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली आहेत. ४४५ प्रकरणे चौकशीकरीता प्रलंबित असून पात्र ६७५२ प्रकरणी शासन निर्णय, दिनांक २३ जानेवारी, २००६ नुसार प्रत्येकी रुपये १.०० लक्षची मदत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना देण्यात आली आहे.

(४) शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी प्रामुख्याने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

१) शेती पिकांसाठी पर्याप्त सुविधा उपलब्ध होण्यासाठी विदर्भातील आत्महत्येचे प्रमाण जास्त असलेल्या ६ जिल्ह्यांकरिता विशेष पॅकेज.

२) शेतकऱ्यांना समुपदेशनाची व प्रबोधनाची आवश्यकता विचारात घेऊन विविध उपाययोजना.

३) विशेष मदतीच्या कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांच्या विकासासाठी "कृषी समृध्दी" योजनेच्या अनुषंगाने विविध विभागांकडून उपाययोजना.

४) पथदर्शी प्रकल्प म्हणून विशेष मदतीचा कार्यक्रम यवतमाळ व उस्मानाबाद जिल्ह्यात बळीराजा चेतना अभियान राबविण्यात आले.

५) शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा, आरोग्य सेवा, शेती विकासाचे कार्यक्रम राबविणे व त्यांच्या मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणे अशा उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची पुनर्रचना करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय महाविद्यालय, अकोला येथे एमआरआय मशीन उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३९) ४२८९ (१७-०७-२०२०). डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील शासकीय महाविद्यालय, अकोला येथे एमआरआय मशीनसाठी धर्मादाय आयुक्त यांनी निधी देऊन सुध्दा एमआरआय मशीनची प्रक्रिया थांबली असून स्थानिक रुग्णालय प्रशासन गरज पडल्यास अधिक निधीची मागणी करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडे आवश्यक असा निधी असून सुध्दा खरेदीची प्रक्रिया थांबली असून मशीन उपलब्ध करून दिले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, करोडो रुपयांची यंत्र सामग्री वापराविना पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासकीय महाविद्यालय, अकोला येथे एमआरआय मशीन उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१४-१०-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) संबंधित संस्थेस शासनाने प्रथम ३ टेस्ला एमआरआय यंत्रसामुग्री खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती. तद्नंतर संस्थेच्या मागणीनुसार ३ टेस्ला एमआरआय यंत्रसामुग्रीच्या खरेदीसाठी सुधारित किंमतीस शासनस्तरावरून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर यंत्रसामुग्री खरेदीस निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदर यंत्रसामुग्री खरेदीची निविदा हाफकीन महामंडळाने प्रसिध्द केली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) संबंधित संस्थेस माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये ३ टेस्ला एमआरआय यंत्रसामुग्री खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती. तद्नंतर संस्थेच्या मागणीनुसार ३ टेस्ला एमआरआय यंत्रसामुग्रीच्या खरेदीसाठी सुधारित किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर यंत्रसामुग्रीची खरेदीसाठी हाफकीन महामंडळाने निविदा प्रसिध्द केली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तारापूर अणुशक्ती ऊर्जा प्रकल्पातील कर्मचाऱ्यांना वेतन अदा करण्याबाबत

**(४०) ४४०७ (१५-०७-२०२०). श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर अणुशक्ती ऊर्जा प्रकल्पातील अत्यावश्यक सेवा बजावलेल्या १२०० कर्मचाऱ्यांना कंपनीने वेतन दिले नसल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अत्यावश्यक सेवा बाजवणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतन न मिळाल्याने याबाबत जिल्हा परिषद सदस्य यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कर्मचाऱ्यांना वेतन मिळण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१३-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

तारापूर अणुशक्ती ऊर्जा प्रकल्पातील अत्यावश्यक सेवा बजावलेल्या १२०० कर्मचाऱ्यांना माहे जून, २०२० चे वेतन कंपनीने दिले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

जिल्हा परिषद सदस्य यांनी जिल्हाधिकारी यांस दिनांक २५ व २८/०५/२०२० रोजी पत्राव्दारे वेतन दिले नसल्याची तक्रार केली होती.

(३) याप्रकरणी समुचित शासन हे केंद्र शासन आहे. याबाबत श्रम प्रवर्तन अधिकारी (केंद्रीय), मुंबई यांनी तारापूर अणुऊर्जा स्टेशनला पत्र पाठवून उचित कार्यवाही करण्याबाबत सूचित केले होते. त्यानुसार माहे मार्च, २०२० चे वेतन देण्यात आल्याचे तसेच माहे एप्रिल व मे, २०२० महिन्यांचे वेतन अदा करण्याबाबत संबंधित कंत्राटदारास श्रम प्रवर्तन अधिकारी (केंद्रीय), मुंबई यांनी सूचना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उपविभागीय कृषी अधिकारी, माणगाव (जि.रायगड) यांचेवर कारवाई करण्याबाबत

**(४१) ४४५९ (३१-०७-२०२०). श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगाव (जि.रायगड) तालुक्यातील उपविभागीय कृषि अधिकारी हे मुख्यालयी उपस्थित न राहता विनापरवानगी गैरहजर राहत असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उपविभागीय कृषी अधिकारी यांच्या निलंबनाचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित असून सदर प्रस्तावावर प्रशासन जाणूनबुजून कार्यवाही करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निसर्ग चक्रिवादळामुळे लाखो शेतकऱ्यांच्या फळबाग तसेच अन्य पिकांचे नुकसान झाले असतांना उक्त उपविभागीय कृषी अधिकारी, माणगाव यांनी याप्रकरणी कोणतीही कार्यवाही केली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कर्तव्यात कसूर करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१६-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) श्री.मिलींद धर्माजी जाधव, उपविभागीय कृषी अधिकारी यांच्या निलंबनाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे. तथापि, सदर प्रस्ताव त्रोटक स्वरुपाचा असल्यामुळे यासंदर्भात सविस्तर वस्तुस्थिती तपासून तातडीने सादर करण्याबाबत कृषी आयुक्तालयाच्या अखत्यारीतील दक्षता पथकास कळविण्यात आले आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) श्री.मिलींद धर्माजी जाधव, उपविभागीय कृषी अधिकारी हे याप्रकरणी दोषी आहेत किंवा कसे, याबाबत चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत कृषी आयुक्तालयाच्या अखत्यारीतील दक्षता पथकास कळविण्यात आले आहे.

---

## बॅकलॉक व एटीकेटी विद्यार्थ्यांच्या परीक्षेत गोंधळ निर्माण झाल्याबाबत

**(४२) ४५६३ (२२-०७-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनामार्फत विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत सरासरी गुण ठरवून योग्य सूत्र विद्यापीठांनी ठरवावे असे निर्णय झाल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले तसेच बॅकलॉक व एटीकेटी विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत कोणताही स्पष्ट निर्णय झाला नसल्याने विद्यार्थांचे शैक्षणिक भविष्य धोक्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सर्व परिस्थितीत राज्यात ११ कृषी विद्यापीठांनी आपापले वेगळे सूत्र ठरवले तर विद्यार्थी देशात स्पर्धेत कसे टिकणार, प्रतिज्ञापत्र द्यायची अट टाकली कसे देणार, प्रत्यक्ष की ऑनलाईन असे अनेक प्रश्न विद्यार्थ्यांसमोर निर्माण झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या अत्यंत महत्वाच्या विषयी विद्यार्थ्यांचा गोंधळ दूर करून त्यांना न्याय देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१४-१०-२०२०) :** (१) नाही, हे खरे नाही.

भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार व राज्यातील चारही कृषी विद्यापिठांच्या कुलगुरु समन्वय समिती आणि संचालक शिक्षण समन्वय समितीने निश्चित केलेल्या आणि मा.मंत्री (कृषी) महोदयांनी जाहीर केलेल्या कृती आराखडयानुसार माहे एप्रिल व मे, २०२० मध्ये दुसऱ्या, चौथ्या, सहाव्या सत्रातील विषयांच्या परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या नियमित व ATKT (Repeater) विषयाबाबत सर्व विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करण्याचे धोरण कृती आराखडयामध्ये जाहीर झालेले आहे. ATKT बाबत सर्व विद्यार्थ्यांचे रेग्युलर विषयांसोबत मागील सत्राचे ४ ते ५ विषय घेण्याची तरतूद देण्यात आलेली आहे, त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० च्या सत्र २ मधील नोंदणी असलेल्या सर्व विषयात सरासरी गुणानुसार उत्तीर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना मागील सत्रातील दोन विषयात अनुत्तीर्ण असल्यास कम्पार्टमेंट परीक्षेची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. जेणेकरुन अशा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळता येईल.

(२) नाही. मा.मंत्री महोदयांनी जाहीर केलेला कृती आराखडा हा राज्यातील चारही कृषी विद्यापीठांना लागू करण्यात आलेला असून त्यानुसारच चारही कृषी विद्यापीठांमध्ये कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच याबाबत प्रत्येक महाविद्यालयामध्ये तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आलेला असून त्यांच्यामार्फत विद्यार्थ्यांना माहिती दिली जाते. प्रतिज्ञापत्र सादर करण्याची अट कोणत्याही विद्यापीठाने टाकलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औषधी, साहित्य आणि वैद्यकीय उपकरणांची खरेदी तातडीची गरज या सबबीखाली करीत असल्याबाबत

**(४३) ४६३० (२२-०७-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोविड-१९ प्रादुर्भाव रोखण्यासाठी देशभर राष्ट्रीय आपत्ती निवारण कायदा लागू आहे अशा आपत्कालीन परिस्थितीत "तातडीची गरज" या सबबीखाली राज्याचा सार्वजनिक आरोग्य विभाग मोठ्या प्रमाणात औषधी, साहित्य आणि वैद्यकीय उपकरणांची खरेदी करीत असून शासनासाठी १७ रुपये ३३ पैशांना उपलब्ध असलेल्या एन-९५ मास्क रुपये २००/- दराने खरेदी केल्याची बाब माहे जुलै, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हाफकिन संस्थेने एन-९५ मास्क १७ रुपये ३३ पैशांना एक या दराने खरेदी केली असून तेच मास्क आता स्थानिक पातळीवर "तातडीची गरज" या नावाखाली रुपये २००/- नी खरेदी केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १७ रुपये ३३ पैशांनी उपलब्ध होणाऱ्या एन-९५ मास्क रुपये २००/- नी खरेदी करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०८-१०-२०२०) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

आवश्यकतेनुसार जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेने २ ते ३ जिल्ह्यांनी जिल्हास्तरावर वेगवेगळ्या दराने खरेदी केली हे खरे आहे.

(३) कोविड-१९ च्या अनुषंगाने लॉकडाऊन परिस्थितीमुळे उत्पादन क्षमता कमी व मागणीत झालेली प्रचंड वाढ यामुळे पुरवठादारांकडून वेगवेगळ्या दराने एन-९५ मास्कची विक्री करण्यात आली आहे.

(४) होय, चौकशी केली आहे. फक्त २ ते ३ जिल्हयांमध्ये अत्यावश्यक व तातडीची गरज असल्याने रुपये ४५-१०० या वेगवेगळया दराने खरेदी झालेली आहे. त्यामुळे तफावत दिसून येते, कोविड-१९ या विषाणू रोखण्यासाठी उपाययोजना म्हणून खरेदी केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत

**(४४) ४७४९ (१९-०८-२०२०). डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनाच्या संकट काळात शासकीय कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता शासन गोठविणार असल्याची बाब माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय कर्मचाऱ्यांचा १० महिन्याचा महागाई भत्ता प्रलंबित असून विविध विभागातील कर्मचाऱ्यांना वेतनाचा पहिला हफ्ताही मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने महागाई भत्ता व वेतनाचा हफ्ता मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (१३-१०-२०२०) :** (१) होय, केंद्र शासनाच्या धर्तीवर महागाई भत्ता गोठविण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. याबाबत अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही.
(२) अंशत: खरे आहे.

दिनांक १ जानेवारी, २०१९ ते दिनांक ३० जून, २०१९ या ६ महिन्यांची तसेच दिनांक १ जुलै, २०१९ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २०१९ या ५ महिन्यांची अशा एकूण ११ महिन्यांच्या महागाई भत्त्याची थकबाकी प्रलंबित आहे.

तसेच ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनाची थकबाकी ५ हप्त्यात देण्याचे आदेश शासन अधिसूचना वित्त विभाग, दिनांक ३० जानेवारी, २०१९ अन्वये निर्गमित केले असून त्याबाबत शासन परिपत्रक, वित्त विभाग, दिनांक २० फेब्रुवारी, २०१९ आणि दिनांक ३० मे, २०१९ अन्वये स्पष्टीकरणात्मक सूचना निर्गमित केल्या आहेत.

वरील आदेशांनुसार वेतनाच्या थकबाकीचा पहिला हप्ता दिनांक १ जुलै, २०१९ रोजी यथास्थिती भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्याचे/ रोखीने अदा करण्याचे आदेशित केले आहे.

(३) व (४) राज्याची आर्थिक स्थिती विचारात घेऊन महागाई भत्त्याची थकबाकी मंजूर करण्याबाबत उचित निर्णय घेण्यात येईल.

वरील उपप्रश्न क्रमांक (२) च्या उत्तरात नमूद केल्याप्रमाणे थकबाकीचा पहिला हप्ता अदा करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

---

## पुणे जिल्हयात पंतप्रधान, रमाई, शबरी आणि पारधी घरकुल योजनेंतर्गत कामास विलंब होत असल्याबाबत

**(४५) ३२३४६ (१८-०८-२०१७). श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयात पंतप्रधान, रमाई, शबरी आणि पारधी घरकुल योजनेंतर्गत लाभार्थ्यांना घर बांधण्यासाठी पहिला हप्ता देण्यात आलेला असूनही घरकुलाचे काम सुरु करण्यात आले नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार घरकुल योजना पूर्ण क्षमतेने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२०-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रत्नागिरी शहरात पावस्कर हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांच्या व प्रशासनाच्या निष्काळपणामुळे ज्ञानदा पुळेकर या महिलेचा मृत्यू झाल्याबाबत

**(४६) ४१८६६ (०२-०८-२०१८). श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी शहरात खाजगी रूग्णालय चालविणाऱ्या डॉक्टरांमार्फत नागरीकांकडून वैद्यकीय सेवेसाठी जादा शुल्क आकारला जात असल्याच्या तक्रारी जिल्हा शल्य चिकित्सक श्री.प्रल्हाद देवकर यांना प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पावसकर रुग्णालयामध्ये डॉक्टरांच्या व प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे ज्ञानदा पुळेकर या महिलेचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी डॉक्टर व रुग्णालय प्रशासनावर जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (११-११-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी भा.दं.वि.सं. कलम ३०४, ४६५, ४६८, ३४ अन्वये रत्नागिरी शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा न..७१/२०१८ दाखल करण्यात आला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

तसेच, मुंबई शुश्रुषागृह नोंदणी अधिनियम, १९४९ नुसार जिल्हा शल्य चिकित्सक रत्नागिरी यांनी पावसकर रुग्णालय, रत्नागिरी यांचा नर्सिंग होम चालविण्याचा परवाना पुढील आदेश होईपर्यंत निलंबित केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## प्रधानमंत्री घरकुल योजनेच्या बांधकामासाठी शासनाकडून अनुदान देण्यात येत असल्याबाबत

**(४७) ४२०५१ (०२-०८-२०१८). श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री घरकुल योजनेच्या बांधकामासाठी शासनाकडून देण्यात येत असलेल्या अनुदानाच्या रक्कमेपेक्षा बांधकामाचे साहित्य महागले असुन रेतीचे भाव प्रतिब्रास किमान चार हजार रुपये झाले असल्याने शासनाकडून देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या एका हफ्त्यातील रक्कमेमध्ये रेतीचा एक ट्रक खरेदी करण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) तसेच, लाभार्थ्यांचे मागील दोन वर्षापासून घरकुल योजनेचे अनुदान मिळाले नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने लाभार्थ्यांना अनुदान मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०३-११-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) महसूल व वन विभागाच्या दिनांक ५/१०/२०१८ च्या अधिसूचनेनुसार घरकुलासाठी प्रति लाभार्थी ५ ब्रास पर्यंत वाळू मोफत उपलब्ध करुन देण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात आदिवासींसाठी राबविण्यात येणाऱ्या घरकुल योजनेबाबत

**(४८) ४२४८७ (०१-०९-२०१८). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१५-२०१६ मध्ये आदिवासी पाडयातील आदिवासींना पक्क्या घरकुल योजनेंतर्गत बांधून देण्यात येणारी १८८ घरकुले अपूर्णावस्थेत असून, सन २०१६-२०१७ मध्ये ८०९ घरकुलांपैकी फक्त १४३ घरांचे बांधकाम पूर्ण झाले आहे, सन २०१७-२०१८ हया वर्षी ३१० घरकुलांपैकी एकही घरकुल पूर्ण झाले नसल्याची बाब घरकुल योजनेच्या सद्य:स्थिती अहवालातून स्पष्ट झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेसाठी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत व इंदिरा आवास योजनेंतर्गत देण्यात येणारे अनुदानही वेळेवर मिळत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या योजनेचा आढावा घेऊन सदरील योजना प्रलंबित राहणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच आदिवासींचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०३-११-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, घरकुल योजनांतर्गत सन २०१६-२०१७ व २०१७-२०१८ मधील मंजूर घरकूले व पूर्ण घरकुलांची सद्य:स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

| | प्रधानमंत्री आवास (ग्रामीण) | | रमाई आवास | | शबरी आवास | | पारधी आवास | | अदिम/कोलम | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | मंजूर | पूर्ण | मंजूर | पूर्ण | मंजूर | पूर्ण | मंजूर | पूर्ण | मंजूर | पूर्ण |
| २०१६-१७ | २२४६३९ | १८५०६३ | ४९८९१ | ४०७७४ | २०९७२ | १७३२९ | १३३५ | ११३० | २०५७ | ११०६ |
| २०१७-१८ | १४१०२४ | ८९२५८ | ९१९८५ | ३३२४८ | ९१५० | २६९१ | ८८० | ३२० | १४८९ | ३९२ |

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी आश्रमशाळांवर नियंत्रण ठेवण्याबाबत

**(४९) ४२४८८ (०१-०८-२०१८). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये सोयी सुविधा पुरविण्यात येत असून त्यावर नियमित नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाकडे कोणतीच यंत्रणा नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आदिवासी आश्रमशाळांवर नियमित नियंत्रण ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२८-१०-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

आदिवासी विकास विभागामार्फत विविध कार्यक्रमांव्दारे आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या सोयी सुविधेत वाढ करण्यात आलेली आहे. आदिवासी विकास विभागाने शासकीय आश्रमशाळा बांधकाम व दुरुस्तीची कामे त्वरीत होण्यासाठी दिनांक १४ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयान्वये स्वतंत्र बांधकाम कक्षाची स्थापना केलेली आहे. सदर बांधकाम कक्षाकडून शासकीय आश्रमशाळांची बांधकामे व दुरुस्तीची कामे तातडीने करण्यात येतात. तसेच उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये विशेष अभियान राबवून शाळास्तरावर बहूतांश शाळामधील शालेय इमारत, मुला/मुलींचे वसतिगृह, स्नानगृह शौचालय, वर्ग खोल्या, स्वयंपाकगृह, विद्युत फिटींग इ. बाबींची मोहिमतत्वावर दुरुस्ती करण्यात आली आहे. शासकीय आश्रमशाळांमध्ये स्वच्छता गृह/स्नानगृहांची दुरूस्ती, आवश्यकतेनुसार नवीन बांधकाम करणे, पाणीपुरवठा, भोजनगृह, हॅण्डवॉश स्टेशन्स इत्यादी सुविधा वाढविण्यासाठी वॉश कार्यक्रम राबविण्यात आला आहे. कायापालट अभियानांतर्गत शासकीय आश्रमशाळांना फर्निचर, बेंचेस, बेडींग साहित्य, कपाट, गाद्या, खुर्च्या इत्यादी साहित्य पुरविण्यात आले. तसेच शाळेच्या नियमित देखरेख व नियंत्रणाकरिता प्रत्येक शाळेत शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आली असून सदर समितीला किरकोळ दुरूस्तीकरिता निधी उपलब्ध करून

देण्यात येतो. याशिवाय प्रकल्प अधिकारी, अपर आयुक्त, आदिवासी विकास व आयुक्त, आदिवासी विकास या यंत्रणाकडून आश्रमशाळांमधील सोयी सुविधांबाबत नियमित नियंत्रण ठेवले जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी आश्रमशाळा बंद करण्याच्या निर्णयाबाबत

**(५०) ४३७१७ (०१-०८-२०१८). डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विकास विभागातील ठाणे कार्यक्षेत्रातील २८ व घोडेगाव प्रकल्पातील ६ आदिवासी आश्रमशाळा बंद करण्याच्या निर्णयाबाबत शासन विचाराधीन असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी आश्रमशाळा बंद करण्याच्या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना दूर जाऊन शिक्षण घ्यावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आदिवासी आश्रमशाळा बंद न करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१४-१०-२०२०) :** (१) व (२) अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्या अंतर्गत असलेल्या ३० शासकीय आश्रमशाळांमधील इ.१ली ते इ.४ थी तील कमी विद्यार्थी संख्या असलेल्या विद्यार्थ्यांचे समायोजन त्याच प्रकल्पातील दुसऱ्या आश्रमशाळांमध्ये करण्याबाबत शासन पत्र दिनांक १८/११/२०१७ अन्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार पेण प्रकल्पांतर्गत असलेली नेणवली व कळंब या शाळेतील विद्यार्थ्यांचे अनुक्रमे

शासकीय आश्रमशाळा सानेगांव व पाथरज, पिंगळज, चाफेवाडी या शाळांमध्ये करण्यात आले आहे. सदर दोन शाळा वगळता इतर शाळांबाबत प्रकल्प कार्यालयांकडून समायोजनाची प्रक्रिया पूर्ण न झाल्याने सदरच्या शाळा या समायोजित न करता सद्य:स्थितीत त्याच ठिकाणी सुरू आहेत.

तसेच दिनांक २३/०१/२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रकल्प कार्यालय, घोडेगांव अंतर्गत ६ व प्रकल्प कार्यालय, पेण अंतर्गत २ असे एकूण ८ शासकीय आश्रमशाळा या आदिवासी उपाययोजना क्षेत्राबाहेरील कमी विद्यार्थी संख्या असलेल्या शाळा बंद करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. तथापि, दिनांक १४/०६/२०१९ रोजीच्या शासन पत्रानुसार सदर शासन निर्णयास स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे सदर आश्रमशाळा नियमित सुरू आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**<br>**मुंबई.**

**श्री.राजेंद्र भागवत**<br>**सचिव,**<br>**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.